## प्रकरण पहिले

# ‘तमाशा’ : संकल्पना आणि बदलते स्वरुप

# प्रकरण पहिले

# 'तमाशा' : संकल्पना आणि बदलते स्वरुप

**प्रस्तावना**

**१. तमाशाची संकल्पना**

अ) तमाशाची उत्पत्ती

ब) तमाशा शब्दाचा विविध शब्दकोशातील अर्थ (मराठी, हिंदी, इंग्रजी)

क) तमाशाची जडणघडण

ड) तमाशाची व्याख्या

इ) तमाशाचे कालमानपरत्वे स्वरुप

क) पेशवेकालीन तमाशाचे स्वरुप

ख) इंग्रजकालीन तमाशाचे स्वरुप

ग) आधुनिक तमाशा

**२. तमाशाचे घटक/अंगे**

अ) गण

ब) गवळण

क) लावणी

ड) बतावणी

इ) वग

**३. तमाशातील वाद्ये**

अ) ढोलकी

ब) तुणतुणे

क) हलगी/कडे

ड) झांज

४. **तमाशातील पात्रे**

अ) नाची

ब) सोंगाड्या

क) मावशी

ड) सुरत्ये/झीलकरी

इ) सरदार

५. **तमाशाचे प्रकार**

अ) ढोलकी फडाचा तमाशा

ब) संगीतबारीचा तमाशा

क) खानदेशी तमाशा

ड) विदर्भातील तमाशा अर्थात 'खडी गम्मत'

इ) कोल्हाटणींचा तमाशा

फ) तख्ती तमाशा

६. **तमाशाचे बदलते स्वरुप**

- **समारोप**
- **संदर्भग्रंथ**

-----

# प्रकरण पहिले
# 'तमाशा : संकल्पना आणि बदलते स्वरुप'

## प्रस्तावना

'कीर्तनानं सुधारला नाही आणि तमाशानं बिघडला नाही' असा हा महाराष्ट्र होय. मराठी माणूस हा जितका मवाळ तितकाच रंगेल आणि त्याहूनही अधिक रंगेल स्वभावाचा. तमाशा आणि मराठी माणसाचं खूप जवळचं नातं आहे. १७ व्या शतकापासून मराठी बहुजन समाजामध्ये 'तमाशा' हा अतिशय लोकप्रिय असणारा कलाप्रकार आहे. हा कलाप्रकार सिध्द होण्यापूर्वी महाराष्ट्रात गोंधळ, वाघ्यामुरळी, दशावतार, बहुरूपी, वासुदेवाची गाणी, पोतराज इ. लोककलाप्रकार प्रचलित होते. असे विविध कलाप्रकार व धार्मिक अधिष्ठान असलेली विधिनाटये महाराष्ट्रात प्रचलित होती व आजही ती आहेत. ही विधिनाट्ये एकाच वेळी माणसाचे धार्मिक समाधान करीत होती आणि रंजनाची भूकही भागवीत होती.

या सर्व नाटयात्मक लोककलाप्रकारात आणि 'तमाशा' यामध्ये तांत्रिक अंगाच्या दृष्टीने आणि वाङ्.मयीन बाजूने काहीएक प्रमाणात साधर्म्य आढळते. या सर्व लोककलाप्रकारात आणि तमाशातील गण, गौळण या घटकांमध्ये धार्मिकता आढळत असली तरी हा कलाप्रकार प्रामुख्याने रंजन करण्यासाठीच निर्माण झाला आहे.

तमाशा हा गण, गौळण, लावणी, बतावणी आणि वग अशा पाच अंगांनी समृध्द झालेला आहे. महाराष्ट्रात जे अनेक प्रयोगरूप कलाप्रकार आहेत त्यापैकी

'तमाशा' अतिशय महत्त्वपूर्ण आणि बहुजन समाजात प्रिय असणारा कलाप्रकार आहे.

याच तमाशा क्षेत्रातली 'विठाबाई भाऊ (मांग) नारायणगांवकर' या एकेकाळच्या 'तमाशासम्राज्ञी' चे चरित्र लेखक योगिराज बागूल यांनी लिहिले. तिचे दु:ख,वेदना, सोसाव्या लागलेल्या हालअपेष्टा, अडाणीपणा आणि त्यामुळेच तिला तिचा पती मारूती सावंतचा छळ सहन करावा लागला. तिचे वैभवाचे तसेच विपन्नावस्थेचे, कफल्लकतेचे दिवस या सर्वांची एकत्रित गोळाबेरीज म्हणजे योगिराज बागूलांनी लिहिलेले 'तमाशा: विठाबाईच्या आयुष्याचा' हे चरित्र होय. त्याचाच अभ्यास प्रस्तुत लघुप्रबंधिकेत केला जाईल.

## १) तमाशाची संकल्पना :

तमाशाची संकल्पना पाहत असता या संकल्पनेमध्ये तमाशाची उत्पत्ती केव्हा व कशी झाली? 'तमाशा' या शब्दाचा अर्थ, तमाशाची व्याख्या, तमाशाचे स्वरूप, तमाशाची अंगे, तमाशाचे प्रकार, तमाशातील पात्रे यांचा समावेश होतो. त्यांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे –

### अ) तमाशाची उत्पत्ती :

ज्या कलाप्रकाराला आपण 'लोकनाटय' या नावाने ओळखतो त्यालाच पूर्वी 'तमाशा' या नावाने लोक ओळखत होते. 'तमाशा' आणि 'लोकनाटय'यांच्या नावात फरक आहे. त्याप्रमाणे त्यांच्या सादरीकरणामध्येही फरक आहे. आजही खेडयामध्ये 'लोकनाटय'हा शब्द प्रचलित नाही. त्याऐवजी 'तमाशा' हा शब्द रूढ

आहे. अलीकडच्या २०-२५ वर्षापासून 'तमाशा'या कलाप्रकाराला 'लोकनाटय' हे नाव मिळालेले आहे.

समाजाच्या अगदी शेवटच्या थरातील बहुधा खेडयापाडयातील अस्पृश्य कलावंत हा जो खेळ करून दाखवितात त्याला शे-पाऊणशे वर्षापूर्वी 'तमाशा'हे ही नाव निश्चित नव्हते. लोक बघायला जमतील अशा कोणत्याही खेळाला तमाशा असे त्यावेळी म्हणत असत. पण पुढे मात्र ढोलकी, तुणतुणे ही वाद्ये आणि लावण्या हे नाटयवाङ्.मय यांनी युक्त असलेल्या खेळालाच लोक तमाशा म्हणू लागले.

'तमाशा'या शब्दाबद्दल काही खेडवळ लोकांनी 'तम् +आशा'अशी फोड करून त्याचा अर्थ 'ज्यात तमोगुणाची अशा लागते तो' [१] असा केला आहे. तमाशा हा एकेकाळी बदनाम झालेला कलाप्रकार आहे. काही लोक तमाशाला कला किंवा तमासगिराला कलावंत म्हणायलाच तयार नव्हते. संतांनी तसेच कीर्तनकारांनीही 'तमाशा' हे पापाचे वसतिस्थान आहे अशीच समाजाला शिकवण दिलेली आहे. आजही पांढरपेशा वर्ग तमाशाला नाके मुरडतो काही वर्गातल्या स्त्रिया तर ढोलकी तुणतुण्याचा आवाज ऐकणेही पाप समजतात.

तमाशाचा जन्म केव्हा, कुठे आणि कसा झाला याविषयी नामदेव व्हटकर म्हणतात, ''तमाशा हा शब्द मूळ पर्शियन भाषेतील आहे, तेथून तो उर्दूत आला. उर्दूतून मराठी भाषेत येऊन रूढ झाला आहे. उर्दूत आणि पर्शियन भाषेत त्याचा अर्थ 'मौजेचे, आनंद देणारे किंवा आश्चर्यजनक दृश्य' असा आहे. त्या भाषेचे लोक, ''ईश्वरा, त्या त्या जगताची रचना करून आम्हाला केवढा तमाशा दाखविला आहेस,'' असा त्याचा वापर करू शकतात. मराठीत मात्र 'हिणकस, हिडीस देखावा' असा लाक्षणिक अर्थ त्याला आलेला आहे. ''तुम्ही दोघे भाऊ भांडणे

करून दुनियेला तमाशा दाखवू नका''असा बाप मुलाला उपदेश करील, म्हणजे वाईट दृश्यालाच तमाशा म्हणावे असा तो मराठीत बनला आहे.''[२]

तर 'भारतीय संस्कृतीकोशा'त 'तमाशा' या शब्दाच्या उत्पत्तीविषयी पुढील माहिती मिळते. 'तमाशा' हा शब्द अरबी असून त्याचा अर्थ 'प्रेक्षणीय दृश्य' असा आहे. तमाशा संस्थेच्या शिल्पकारांना असलेली 'शाहीर'ही संज्ञाही मूळ 'शायर' किंवा 'शाहर' या अरबी शब्दापासून बनलेली आहे. तमाशा संस्थेचे आणि तिच्या शिल्पकाराचे नाव अरबी असल्यामुळे ही संस्था मुसलमानांच्या प्रभावातून उदय पावली असावी, असा काही विद्वानांचा कयास आहे.'[३]

'तमाशा' परंपरेविषयीचा संदर्भ मराठी विश्वकोशातही सापडतो. तो पुढीलप्रमाणे आहे. 'तमाशा' हा शब्द मूळचा मराठी भाषेतील नसून तो उर्दूतून मराठीत आला आहे. १३-१४ व्या शतकात दक्षिण भारतात मुसलमानी अंमल सुरु झाल्यापासून तो मराठीत आढळतो. एकनाथांच्या एका भारुडात 'बडे बडे तमाशा देखे' अशीओळ आहे.[४] अशी माहिती तमाशाच्या जन्माविषयी सापडते.

''१७२० च्या पेशवाईच्या सुरुवातीबरोबर लावणी आणि गाण्याचे जे फड दिसतात ते या मध्यंतरीच्या ३०-४० वर्षांत बनत गेले म्हणजे लावण्याची रचना आणि त्या गाऊन दाखविणारे फड-तमाशे हे मराठी भाषेबरोबर नव्हे, तर मराठी राज्याबरोबर जन्माला आले ! अशा रीतीने लावण्या-तमाशो हे १७व्या शतकाचा शेवट आणि १८व्या शतकाची सुरुवात या वेळी जन्माला आले.''[५] असे नामदेव व्हटकरांचे मत आहे.

**ब) 'तमाशा' शब्दाचा विविध शब्दकोशातील अर्थ :**

**मराठी शब्दकोशातील अर्थ पुढीलप्रमाणे –**

१) कै. वा.गो. आपटे संपादीत 'मराठी शब्दरत्नाकर' मध्ये 'तमाशा' या शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे.

'तमाशा – खेळ, मौज, निर्लज्जपणाची चेष्टा'[६]

२) 'साकेत शालेय मराठी शब्दकोशा'त स.ध. झांबरे यांनी 'तमाशा' या शब्दाचा अर्थ खालीलप्रमाणे सांगितला आहे.

अ) ''लोकनाट्य, वगनाट्य

ब) निर्लज्जपणाचे वर्तन

क) फजिती.''[७]

३) 'बृहत हिंदी–मराठी शब्दकोशा'त संपादक गो.प. नेने व श्रीपाद जोशी यांनी तमाशा या शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणो सांगितला आहे.

अ) ''खेळ, करमणूक

ब) आश्चर्यकारक गोष्ट.''[८]

४) 'वाङ्मयीन संज्ञा – संकल्पना कोशा'त 'तमाशा' या शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणे दिला आहे.

''दृश्य, प्रदर्शन, करमणुकीचा देखावा, समारंभ इ....''[९]

हिंदी भाषेतील वेगवेगळ्या शब्दकोशात 'तमाशा' या शब्दाचे विविध अर्थ सांगितले आहेत ते पुढीलप्रमाणे –

१) रामचंद्र वर्मा संपादित 'प्रामाणिक हिन्दी कोशा'त 'तमाशा' या शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे.

अ) "वह खेल या कार्य जिसे देखने से मन प्रसन्न हो ।

ब) अद्‌भूत व्यापार । अनोखी बात ।"[१०]

२) 'आधुनिक हिन्दी शब्दकोशा'त संपा. डॉ. गोविन्द चातक यांनी 'तमाशा' या शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणे दिला आहे –

अ) "खेल, क्रीडा, खिलवाड ।

ब) स्वांग, नाटक, खेला ।

क) दिखावा, अद्‌भूत कार्य ।"[११]

इंग्रजी भाषेत 'तमाशा' या शब्दाचे निरनिराळ्या शब्दकोशातील अर्थ पुढीलप्रमाणे आहेत.

१) संपा. प्रो. माधव के. देशपांडे व सह संपा. प्रो. प्रकाश एम्. देशपांडे यांनी Marathi-English Dictionary मध्ये 'तमाशा' या शब्दाचा अर्थ –

"A gay show, an amusing performance;

a Melodramatic entertainment;

a ludicrous show."[12]

२) S.Muthiah संपादित 'Words in Indian English' या शब्दकोशात 'तमाशा' शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगितला आहे.

"A lavish, rather vulgarly loud celebration or entertainment."[13]

अशा प्रकारे मराठी, हिंदी, इंग्रजी शब्दकोशात 'तमाशा' या शब्दाचे विविध अर्थ पहावयास मिळतात.

## क) तमाशाची जडणघडण :

लोककलांची निर्मिती लोकजीवनात झालेली असल्याने त्यातून लोकमनाचा अविष्कार घडणे स्वाभाविक आहे. हे लोकमनच लोककलांना एकप्रकारचा घाट प्राप्त करून देत असते. बदलत्या काळाप्रमाणे त्यात कमी-अधिक बदल होत असला तरी त्याचा मूळ गाभा मात्र लोकपरंपरा जतन करीत असते. महाराष्ट्राच्या 'तमाशा' या लोककलेबद्दलही असेच म्हणता येते. विधिनाट्यापासून उगम पावलेली ही नाट्यकला लोकनाट्य म्हणून लोकजीवनात प्रचलित झाली व लोकप्रियही झाली. रंजनप्रधान लोककला म्हणून तमाशा मराठी लोकजीवनाला भावला. एका आगळ्या-वेगळ्या आनंदाचा प्रत्यय देत, आपले अस्स्ल मराठमोळेपण कायम टिकवून लोकरंजन करीत राहिला.

तमाशाच्या जडणघडणीविषयी डॉ. शरद व्यवहारे आपल्या 'लोकरंजनाची पारंपरिक माध्यमे' या पुस्तकात म्हणतात,

''तमाशाचे मूळ लोकपरंपरेत चालत आलेल्या विधिनाट्यात आपल्याला शोधता येते. विधीशी निगडीत असलेल्या कलाविष्कारातून तमाशा स्वतंत्रपणे विकसित झाला. विधिनाट्यात धर्मभावना प्रधान असते. विधीआचरणाला महत्त्व असते. तर तमाशा रंजनप्रधान असतो. लोकधर्मनाट्यात ही रंजनपरता प्रेक्षकांच्या आवडी-निवडी लक्षात घेतल्यामुळे येते. गोंधळ-जागरण या विधिनाट्यातील 'मुरळी' तसेच कोल्हाटणीच्या नृत्य-गायनाची परंपरा यातून तामशात 'नाची' आली. लोकगीत सारणीतून 'लावणी' शाहिरांनी फुलविली आणि या साऱ्यांच्या

सादरीकरणात रंजनाला प्राधान्य मिळत गेल्याने 'तमाशा' या रंजनप्रधान लोकनाट्याला लोकजीवनात लोकप्रियता लाभली. तमाशाची स्वतंत्र रंगभूमी विकसित झाली.''[१४]

'तमाशा' या कलाप्रकाराची निर्मिती कोणत्या प्राचीन कलांमधून झाली ? तमाशा कशापासून बनलेला आहे ? या संदर्भात 'मराठीचे लोकनाट्य-तमाशा-कला आणि साहित्य' या पुस्तकात नामदेव व्हटकर म्हणतात, ''नंदीवाल्याचा ढोल आणि कोल्हाटणीची ढोलकी यांच्या मिश्रणाने तमाशाची ढोलकी झाली. डौऱ्याचे पद म्हणण्याचे तुणतुणे त्याने घेतले. झांज भजनातल्या टाळांची घेतली. तावातावाने बोलण्याची पद्धती भारुडातून घेतली. वाघ्यामुरळीची हाळ घालण्याची पद्धती स्वीकारली. कडक बोलणारे कडे भेदिकातून घेतले. हे कार्यक्रम उघड्या मैदानावर होत होते. त्या सगळ्यांचे मिळून जे झाले तो 'तमाशा' या प्रकाराचा खेळ झाला. पुढे राजाराणीचे कथानक आले आणि तमाशात वगही आला.''[१५]

श्री. नादमेव व्हटकर यांच्या वरील म्हणण्यानुसार लोकपरंपरेत प्रचलित असलेल्या विविध स्वरुपाच्या नाट्याविष्कारातून नाट्यगुण घेऊन तमाशा लोकरंगभूमीवर आला आहे. त्यांच्या या अभिप्रायात बरेच तथ्य आहे हे नाकारता येत नाही.

तमाशाच्या जडणघडणीत गोंधळी, वाघ्यामुरळीच्या परंपरेप्रमाणेच पेशवेकालीन शाहिरांचेही मोलाचे योगदान आहे. त्यामध्ये अनंत फंदी, रामजोशी, प्रभाकर, होनाजी बाळा, सगनभाऊ असे कितीतरी प्रसिद्ध लावणीकार पेशवाईत होऊन गेले.

काही जाणकार कलावंतांच्या मते तमाशा हा होळीच्या प्रथेतून आला असावा असे त्यांना वाटते. होळीची प्रथा शिवाजी महाराजांच्या काळापासून अस्तित्वात आहे असे दिसते. होळीच्या दिवशी होळीच्या सभोवताली रात्रभर जागरण करण्याची परंपरा आजतागायतही चालू आहे. ''जागरण करावयाचे असेल तर काहीतरी करमणूक हवी म्हणून महारा-मांगांच्या मुलांना पैसे देऊन नाचायला लावायचे आणि त्यांच्याकडून करमणूक करून घ्यायची. पैशाच्या मोबदल्यात ती मुले गाणेही म्हणून दाखवत आणि नाचूनही दाखवत. यातूनच हळूहळू त्यांना पैशाची चटक लागली आणि होळी नसेल त्या दिवशीही असे नाचण्याचे कार्यक्रम होऊ लागले. हळूहळू नाचणाऱ्या मुलांची जागा त्याच समाजातल्या मुलींनी घेतली असावी ! आणि त्यामधूनच आज दिसणारा तमाशा जन्माला आला असावा.''[१६] असे मत काही कलावंतानी प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे मांडलेले आहे. वरील संदर्भ 'विठाबाई भाऊ-बापू (मांग) नारायणगावकर' या लोकनाट्यातील ८० वर्षाचे वयोवृद्ध कलावंत श्री. पांडोबातात्या यांनी मांडलेले आहे. याला लेखी आधार मात्र सापडत नाही.

लावण्या रचना आणि त्या गाऊन दाखविणारे तमाशा फड हे मराठी भाषेबरोबरच नव्हे तर मराठी राज्याबरोबर जन्माला आले हे वरील विवेचनावरून दिसून येते.

## ड) तमाशाची व्याख्या :

भारतात प्राचीन काळापासून लोककलांची फार मोठी परंपरा आहे. आजही त्या ग्रामीण आणि शहरी भागात मोठ्या प्रमाणात सादर केल्या जात असल्याचे

दिसून येते. लोकनाट्य तमाशा, संगीतबारी किंवा जलसा ही त्याचीच काही उदाहरणे आहेत.

काही मान्यवरांनी तमाशाची व्याख्या केलेली आहे ती पुढीलप्रमाणे –

१) **वि.कृ. जोशी :**

"समाजातील सर्व थरांना रमविणारा आणि मराठमोळ्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा असा करमणूकीचा एकमेव प्रकार तमाशा हाच होय."[१७]

२) **नामदेव व्हटकर :**

"लोकनाट्याची विशिष्ट वाद्ये, तमाशा पद्धतीची लावणी, नाची अथवा नाच्याचा वैशिष्ट्यपूर्ण नाच, लोकनाट्याचा एक वेगळाच असलेला थाट, ढब किंवा धाटणी आणि वग हे पाचही प्रकार तमाशाची केवळ वैशिष्ट्ये आहेत.... त्यातला एखाद दुसरा प्रकार जरी वगळला किंवा बदलला तर त्यामुळे त्याला तमाशा म्हणता येत नाही."[१८]

वरील मान्यवरांची मते पाहता असे दिसून येते की, तमाशा हा एक मनोरंजनाचा कलाप्रकार आहे. माणसाच्या मनाची करमणूक करण्याचे त्याला रिझविण्याचे महत्त्वाचे काम तमाशातून होते. तमाशा या लोकनाट्याची जडणघडण गोंधळ, जागरण यासारख्या विधीनाट्यातून झालेली आहे. विधिनाट्यातील विधीकल्पना वजा करून निव्वळ मनोरंजनाला प्राधान्य देऊन जे नाट्य सादर केले त्याला तमाशा म्हणता येईल. अर्थात यात मनोरंजनाबरोबरच समजाप्रबोधनही केले जाते. पण त्याला दुय्यम स्थान दिलेले आढळते.

## इ) तमाशाचे कालमानपरत्वे स्वरुप :

तमाशा हा महाराष्ट्रातील परंपरागत लोकनाट्याचा एक प्रकार. भारतात विविध प्रकारची लोकनाट्ये आढळतात. खेड्यातील यात्रा-जत्रांत आणि होळीसारख्या सण उत्सवात तमाशाच्या कार्यक्रमांना विशेष महत्त्व असते. तमाशाला रंगमंचाची जरुरी नसते. पारासारख्या उंचवट्याच्या जागी किंवा उघड्या मैदानावर माळावर कुठेही तमाशाचा फड उभा राहतो. रॉकेलचे हिलाल पेटवून त्याच्या प्रकाशात तमाशाचे कार्यक्रम होतात. प्राधान्याने शृंगारप्रधान लावण्या म्हणणे व करमणूक करणे हे तमाशाचे स्थूल स्वरुप आहे.

मराठी लोकपरंपरेत प्रचलित असलेल्या विविध प्रकारच्या लोककलांच्या नाट्याविष्कारातून काही लोकधर्मी तत्त्वे स्वीकारुन तमाशाची रंगभूमी आकाराला आली असली तरी लोकधर्मी नाट्याचा, विधिनाट्याचा 'गण' तमाशातही आहे. विधिनाट्यात देवदेवतांचे स्तवन असते तसेच तमाशात 'गौळण' असते. विधिनाट्याच्या उत्तररंगातील पौराणिक आख्यानाची जागा 'वगा'ने घेतली. विधिनाट्याच्या शेवटी आरती असते. त्याऐवजी तमाशात मुजरा स्वीकारला गेला. विधिनाट्यातील देवतांच्या पूजाविधीतून रंगदेवतेची - रंगभूमीची पूजा करण्याची प्रथा निर्माण झाली. विधिनाट्याचा आकृतिबंध आणि तमाशाचा आकृतिबंध यानध्ये वरीलप्रमाणे सारखेपणा दिसून येतो. यावरून तमाशाची रंगभूमी विधिनाट्याच्या रंगभूमीवरुन घेतलेली दिसते.

तमाशाने विधिनाट्याचा आकृतिबंध कायम ठेवला असला तरी त्यातील आशय मात्र बदललेला दिसतो. विधिनाट्याप्रमाणेच तमाशात पूर्वरंग आणि उत्तररंग केले जातात. विधिनाट्याच्या पूर्वरंगात देवदेवतांची प्रतिष्ठापना आणि पूजाविधी

असतो. त्यात विधीआचरणाला महत्त्व असते. तर तमाशात रंगभूमीला देवता मानून फक्त अभिवादन केले जाते. तमाशाचा खेळ निर्विघ्न पार पडावा असा उद्देश त्यामागे असतो. विधिनाट्यातील देवदेवतांच्या आवाहनाच्या व स्तवनपर गीतांच्याऐवजी तमाशात गौळणी व बतावणी आल्या. तमाशाने लौकिकावर अधिक भर दिल्यामुळे तमाशात शुद्ध रंजनप्रधानता आली.

तमाशाची एकंदर प्रकृती पाहिली तर असे दिसून येईल की, "१८ व्या शतकाच्या सुरुवातीला वीरांच्या विषयवासनेवर उतारा म्हणून जन्मलेला हा खेळ १९व्या शतकाच्या सुरुवातीला भक्ती, नीति, ब्रह्मज्ञान यात आला. म्हणजे तमाशाचे हाड शूरवीरांच्या शृंगाराचे, तर मांस सात्त्विकतेचेच दिसते. हाडाचे वळण आणि मासांने दिलेला आकार यांनी प्रकृती बनते, तसे शृंगाराच्या हाडाने आणि सात्त्विकतेच्या मांसाने तमाशाचे शरीर बनले आहे. तमाशाच्या गाडीचे एक चाक शृंगाराचे तर दुसरे ब्रह्मज्ञानाचे होते. या दोन्ही चाकांना जोडणारा कणा शूरवीरांच्या पराक्रमाचा होता."[११] असे नामदेव व्हटकर म्हणतात. साधारणपणे असे तमाशाचे स्वरुप आहे.

तमाशाचे खरे स्वरुप जरी पेशवाईतच-उत्तर पेशवाईतच उदयास आले असले तरी तो प्रकार महाराष्ट्रात पूर्वीपासूनच अस्तित्त्वात होता असे दिसते. पेशवेकालीन तमाशाचे स्वरुप कसे होते ? इंग्रजकाळातील तमाशाचे स्वरुप कसे होते ? आणि आजच्या तमाशाचे स्वरुप काय आहे ? याचा विचार केला तर तमाशाचे स्वरुप कालमानपरत्वे कसे बदलत गेले हे आपोआप लक्षात येईल.

## क) पेशवेकालीन तमाशाचे स्वरुप :

पेशवेकाळात खऱ्या अर्थाने तमाशाला बहर आला. तो फुलला, बहरला तो खऱ्या अर्थाने पेशवाईतच. या काळात शाहिरांची जी एक उज्ज्वल परंपरा उदयास आली त्या परंपरेने तमाशाला लोकप्रियता मिळवून दिली. अनंत फंदी, रामजोशी, प्रभाकर, होनाजीबाळा, सगनभाऊ इ. शाहिरांनी आपल्या कवनांनी तमाशात रंग भरला.

पेशवेकालीन तमाशाला 'ढोलकीचा तमाशा' म्हणत. या तमाशात पुढारी किंवा सरदार, ढोलक्या,कडे वाजविणारा, सोंगाड्या, दोन-चार सुरत्ये किंवा झीलकरी, नाच्या पोर इतकी पात्रे असत.

पेशवेकालीन तमाशात 'वग' हा प्रकार नसला तरी लावणी चालू असता मधून मधून विनोदी कोट्या करून प्रेक्षकांना हसविण्याचे काम सोंगाड्या करीत असे. पेशवेकाळातील प्रसिद्ध शाहीर परशुराम यांच्या फडातील 'भवानी तेली उर्फ बाकेराव' हा पहिला प्रसिद्ध सोंगाड्या व नाच्या होता. पेशवेकाळात होळीच्या सणात तमासगिरांना मुद्दाम बोलावून आणून त्यांचे तमाशे करण्याची पद्धती होती. त्याचप्रमाणे "सण, उत्सव, जत्रा इ. प्रसंगीही तमाशाचे फड होत. त्यातून कसबिणी, कलावंतिणींच्या नृत्यासोबतच शाहिरांनी रचलेल्या कवनांचे संगीत साथीसह सादरीकरण केले जात असे. या तमाशांच्या फडाचे स्वरुप शुद्ध रंजनप्रधान असे. मुलुखगिरीवरून परतलेले शिपाई, नगरातील हौसी लोक, उत्सवाच्या निमित्ताने एकत्र आलेले लोक, जत्रेत आलेले लोक या तमाशाच्या फडाचे प्रेक्षक असत. मनोरंजनासाठी राजाश्रयानेही तमाशाच्या फडाचे कार्यक्रम होत. यावरून

पेशवेकाळात तमाशाला राजाश्रय आणि लोकाश्रयही भरपूर प्रमाणात होता हे दिसते.''[२०]

पेशवाईचा उत्तरकाळ हा तमाशाचा भरभराटीचा काळ होय. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात तो अधिक लोकप्रिय झाला. तमाशा हा सरदार, सोंगाड्या आणि नाच्या या त्रिमूर्तीवरच अवलंबून असे. कलावंतिणीचे नृत्य, ढोलकी, झांज, डफ, कडी, तुणतुणे आणि घुंगराच्या संगीतसाथीवर लावणीसह सादर केले जाई. या तमाशात गाण्याचा व नाचण्याचा भाग अधिक असल्यामुळे सरदार आणि नाच्या यांनाच अधिक महत्त्व असे. प्रथम गण, गौळण आणि त्यानंतर लावण्या, भेदिक, कलगीतुरा असे तमाशाचे स्वरुप होते.

''पेशवेकालीन तमाशाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील लावण्या व भैदिक कवने म्हणजे प्रश्नोत्तररुपी लावण्या. या स्वरुपाच्या कार्यक्रमात तमाशाचे दोन फड सहभागी होत असत. त्यांच्यातील प्रश्नोत्तररुपी कूटात्म लावण्यातून तमाशात एक वेगळीच रंगत येत असे. या स्वरुपाच्या भेदीक कवनात आध्यात्मावर आधारित कूट असत. प्रश्नोत्तराचा, सवाल-जबाबाचा, भेदिकाचा हा कार्यक्रम उत्तररात्रीपर्यंत कधी कधी पहाटेपर्यंत चाले. लोकरंजनपर या लोककलेला पेशवेकाळातील शाहिरांनी एक वेगळेपण प्राप्त करून दिले.''[२१]

या तमाशातील सोंगाड्या हे पात्र चालू राजकीय घडामोडींवर व्यंग करून, कोट्या करून लोकांना हसवित असे. तमाशाच्या शेवटी 'मुजरा' या प्रकारात निरनिराळ्या शाहिरांना वंदन करण्यात येवून त्यांचा आशीर्वाद मागण्यात येई. पेशवेकालीन तमाशाचे हे स्वरुप पुढील काळात कांही वर्षे टिकून राहिले. आजच्या तमाशाची खरी जडणघडण पेशवेकाळातच झाली.

पेशवेकाळातील तमाशाचे स्वरुप गण, गौळण आणि लावणी यांचे नृत्य-संगीतासह सादरीकरण असे होते. पेशवाईच्या अस्तानंतर शाहीर, तमासगीर आणि तमाशातील अन्य कलावंत यांचा राजाश्रय संपुष्टात आला. तरीपण त्यातल्या काहींनी आपापल्यापरीने हा लोककलाप्रकार जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला.

## ख) इंग्रज काळातील तमाशाचे स्वरुप :

पेशवाई संपल्यानंतर पहिली १५-२० वर्षे गोंधळलेल्या मन:स्थितीत आणि नवे अंगवळणी पडण्यातच गेली. लावणीकार आणि तमासगीर एकदम निराधार झाले. पेशवाईनंतर मुख्यत: बडोद्याच्या सयाजीराव महाराजांनी या लोकांना आश्रय दिला. पण बडोदा मराठी मुलूखापासून दूर पडत असल्यामुळे तमासगीरांना राजाश्रय मिळूनही त्याचा काही फायदा झाला नाही. त्यातच भरीत भर म्हणून लावण्यांच्या फड-तमाशांना शह देणारा नाटकाचा प्रकार १८४३ साली सांगलीचे विष्णू अमृत भावे यांनी सुरु केला आणि समाजातील उच्चवर्णीय लोकांचा वर्ग एकदम त्या नाटकाकडे झुकला आणि तमाशा फड हा मग केवळ खेडूतांची करमणूक ठरला.

पेशवेकालीन तमाशाचे स्वरुप इंग्रजांच्या काळात बदलले. तमाशात पूर्वी नाचण्यासाठी एखादा सुस्वरुप, कोवळ्या वयातला नाच्या पोऱ्या असायचा. पण नंतरच्या काळात तो जावून त्याच्याऐवजी तमाशात नाचण्यासाठी कोल्हाटणी (नाची) येऊ लागल्या. या काळातील तमाशात झालेला आणखी एक बदल म्हणजे तमाशात झालेला 'वगा'चा समावेश होय. हे वग धार्मिक, राजकीय, सामाजिक, पौराणिक इ. विषयावर असत.

इंग्रजी अंमलात तमासगिरांचा राजाश्रय तुटला, तसेच या काळात मराठी नाटकांचा पाया घातला गेल्यामुळे करमणुकीचे युग अवतरले. प्रेक्षकांच्या

आवडीनिवडी लक्षात घेऊन तमाशा सादर केला जात असल्याने तमाशात अश्लीलता वाढू लागली. उत्तान हावभाव करीत आणि उत्तान गाणी म्हणत नाचणाऱ्या केवळ स्त्रियांची 'संगीतबारी' याच काळात लोकप्रिय बनली. या स्त्रिया जुन्या शृंगारिक लावण्यांबरोबरच अलीकडच्या मराठी बोलपटातील शृंगारिक गाणीही गाऊ लागल्या. तमाशातील या उत्तानतेला 'दौलतज्यादा'ची जोड मिळाली. त्यामुळे तमाशातील शृंगार ओंगळ, हिडीस झाला. त्यामुळे तमाशात अश्लीलता वाढू लागली. या काळात तमाशाचा लोकमानसावरील प्रभाव ध्यानात घेऊन अनेक सामाजिक व राजकीय संस्थांनी प्रचारासाठी या संस्थेचा भरपूर उपयोग करून घेतला व त्याद्वारे सामाजिक प्रबोधन केले. अशाप्रकारे इंग्रज काळातील तमाशाचे स्वरुप होते

## ग) आधुनिक तमाशा :

रंगमंचावर स्त्रीकलावंतांचा प्रवेश झाल्यापासून तमाशा अधिकच लोकप्रिय झाला. आधुनिक तमाशात दुसरा झालेला बदल म्हणजे वग ! वगामध्ये नाटकासारखेच संवाद आले. परंतु हे संवाद पाठ केलेले व ठरलेले नसतात. त्याचे फक्त कथानक ठरलेले असते. त्याला लिखित अशी संहिता नसते. त्याचे कथानक कलावंतांना माहित असते. त्यावरूनच ते स्वयंस्फूर्तीने व प्रसंगानुरुप शब्दयोजना करीत कथानक पुढे ढकलत असतात. त्यातच कलावंतांची खरी कसरत असते. नाटकाने गाण्याची प्रथा तमाशातून उचलली तर तमाशाने वगातील संवादाची प्रथा नाटकातून उचलली.

नाटकाचे युग अवतरल्यामुळे तमासगिरांच्या पोटावर पाय आला, प्रेक्षकांच्या आवडी-निवडीनुसार त्यांना तमाशा सादर करावा लागला. त्यामुळे

तमाशात सिनेमातली गाणी गायली जाऊ लागली. त्यातूनच संगीतबारी, दौलतज्यादा हे प्रकार तमाशात आले.

आधुनिक काळात अनेक तमासगीर व तमाशा मंडळे उदयास आली. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर तमाशा फड गाजवले आणि तमाशाला लोकप्रियता मिळवून दिली. आधुनिक काळातील तमाशा, गण, गौळण, लावणी, बतावणी आणि वग या पाच अंगांनी समृद्ध झाला आहे.

अशाप्रकारे पेशवेकाळातील तमाशा, इंग्रजकाळातील तमाशा व आधुनिक तमाशाचे स्वरुप होते. आधुनिक तमाशातील वरील पाच महत्त्वाच्या घटकांच्या स्वरुप विशेषांची चर्चा प्रस्तुत भागात केली जाईल.

## २) तमाशाचे घटक / अंगे :

पेशवाईत बहरलेला, उत्कर्षापर्यंत पाहोचलेला तमाशा लावणीप्रधान होता. गण, गौळण आणि लावणी ही त्या काळातील तमाशाची प्रमुख अंगे होती. पेशवाईच्या अस्तानंतर मात्र तमाशाच्या स्वरुपात बदल घडत गेला. संवादाला महत्त्व प्राप्त झाले. वगाच्या रुपात तमाशात कथानक आणि संवाद आले. तमाशाचे स्वरुप अधिक लौकिक बनले. त्यामुळे तमाशाला अधिक लोकप्रियता मिळाली. आज ज्याला आपण 'तमाशा-लोकनाट्य' म्हणतो त्यात पुढील अंगे पहावयास मिळतात.

अ) गण
ब) गवळण
क) लावणी
ड) बतावणी
इ) वग

तमाशाच्या या पाच अंगांच्या स्वरुप-विशेषांची चर्चा प्रस्तुत भागात करावयाची आहे. त्यावरून लोकनाट्य तमाशाचे स्वरुप विशेष लक्षात येऊ शकतील.

पां.ल. जैतापकर आपल्या 'तमाशा कला' या पुस्तकात म्हणतात, ''तमाशा सुरु करण्याची वेळ झाली की एका बाजूने ढोलकीवाला व दुसऱ्या बाजूने हलगीवाला असे दोघेही आपापली सणंगे/वाद्ये वाजवित रंगमंचावर प्रवेश करतात. ते जुगलबंदी असल्यासारखे वादनकलेतील विविध प्रकार आणि बारकावे वाजवून आपले कौशल्य प्रकट करतात व सबंध परिसर नादमधुर करून सोडतात. या वाद्यप्रकाराला 'तोडा' असे म्हणतात. तोडा संपला की गणाला सुरुवात होते....''[२२]

## अ) गण

मंगलकार्यात कोणताही अडथळा येऊ नये ते निर्विघ्न पार पडवे म्हणून कार्याच्या आरंभी देवदेवतांची पूजा व त्यांचे स्तवन करण्याची परंपरा प्राचीन आहे. या परंपरेतूनच तमाशात गण आला असावा. गोंधळ, जागरण इ. लोकधर्मी-नाट्यातही सुरुवातीला गण सादर केला जातो. तमाशाची सुरुवात गणाने होते. गण म्हणजे कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी करावयाचे गणपती स्तवन. पेशवाईत गण गाणाऱ्या शाहिरांत दोन प्रकारचे अध्यात्मिक विचारप्रवाह होते. एक शिव किंवा ब्रह्म मानणारे 'तुरेवाले' आणि दुसरे शक्ती किंवा माया मानणारे 'कलगीवाले'. कलगीवाले आणि तुरेवाले आपापल्या दैवतांचे स्तवन या गणात करीत असत.

'लोकरंजनाची पारंपरिक माध्यमे' या आपल्या पुस्तकात डॉ. शरद व्यवहारे म्हणतात, ''पेशवाईत गणांची संख्या अधिक होती. तसेच खानदेशी तमाशातून पूर्वी

अकरा गण आणि वानदेशी तमाशातून पाच गण सादर केले जात. पण सध्या कमीत कमी एक गण आणि जास्तीत जास्त तीन गण तमाशातून सादर केले जातात. त्यात एक गणपतीचा व बाकी आराध्य दैवतांचे स्तवनपर असतात. गण गाण्याची तमासगिरांची विशिष्ट अशी एक धाटणी असून फक्त पुरुष कलावंतच गण गातात.''[२३] काही पुढे व काही मागे असे पाच-सहा कलावंत मिळून सर्व श्रोत्यांना ऐकू जाईल अशा जोरदार आवाजात गण म्हणून गणरायाला वंदन करतात.

आजचे तमासगिर पठ्ठे बापूराव लिखितच गण सादर करताना दिसतात. पठ्ठे बापूरावांचा एक गण असा -

''जय जय जय जय गरुडध्वजा
आमुची राखावी तू लज्जा
अनंत नामे अनंत रुपे
अनंत अवतार आहे तुझा -
अनंत कर्मे अनंत धर्मे
सज्जन दुर्जन करी पूजा -''[२०]

गणात गणेशवंदन केले जाते. गण स्वत: शाहीर रचतात. गणानंतर 'मुजरा' होतो. मुजऱ्यात तमाशातील प्रत्येक कलावंताच्या कलेची लहानशी झलक असते. गण संपला की नाची ढोलकी तुणतुण्याच्या साथीवर आपल्या नृत्याची झलक दाखविते. त्यानंतर गौळणीस प्रारंभ होतो.

**ब) गवळण :**

गवळणीची परंपरा संत वाङ्मयात पहावयास मिळते. संत ज्ञानेश्वरांपासून ते थेट संत एकनाथांपर्यंत सर्वच संतांनी गवळणी रचलेल्या आहेत. ज्यामधून राधा-

कृष्ण यांचे नाते, कृष्णाच्या विविध लीला आणि त्यांच्या खोड्या यांचे वर्णन केलेले आहे. मराठी शाहिरी वाङ्मयातही शाहिरांनी रचलेल्या गवळणींची संख्या विपुल आहे. परंतु तमाशा शाहिरांच्या गवळणी आणि संतांच्या गवळणी यात फरक आहे. संताच्या गवळणींमधून प्रामुख्याने अध्यात्मावर भर दिला गेला आहे आणि दुसरे म्हणजे कृष्णाच्या बाललीलांचे वर्णनच मुख्यत्वे संताच्या गवळणींमधून बघायला मिळते. तमाशा शाहिरांच्या गवळणींमधून मात्र शृंगाररसावरच अधिक भर देण्यात आला आहे. तमाशात शाहिरांच्याच गवळणी प्रामुख्याने सादर केल्या जातात.

''गौळण हा एक नाट्यप्रकार असतो. त्यात कृष्ण, मावशी, राधा व पेंद्या ही मुख्य पात्रे असतात. त्यांचे रसभरीत, शृंगारिक आणि विनोदपूर्ण संवाद असतात. हे नाट्य करीत असताना विविध प्रकारच्या गवळणी तमाशातून गायल्या जातात. 'डाळीची' म्हणजे बाजाराला जाण्याची गवळण, कृष्णाच्या खोड्या सांगणारी गवळण, एकमेकांचा परिचय करून देणारी गवळण, कृष्णाची विनवणी करणारी गवळण अशा या विविध प्रकारच्या गवळणी होत.''[२५]

आधुनिक तमाशातील गवळणीत दही-दुधाचे हंडे घेऊन मावशीबाईसोबत मथुरेच्या बाजाराला निघालेल्या गवळणी आणि त्यांची वाट अडविणारा श्रीकृष्ण आणि त्याचा सवंगडी हाच प्रसंग प्रामुख्याने सादर केला जातो. राधा आणि तिच्यासोबत असलेल्या गवळणींच्या भूमिका तमाशातील नाची स्त्रिया करतात. तर मावशीबाईची भूमिका तमाशातील वयस्कर स्त्री करते. ज्या तमाशाच्या संचात या भूमिकेसाठी नाची स्त्री उपलब्ध नसेल तेथे पुरुषच मावशीबाईची भूमिका करतो. गवळणीत श्रीकृष्ण हे मध्यवर्ती पात्र असून त्याच्या जोडीला सवंगडी म्हणून तमाशातला सोंगाड्या असतो.

गवळणींची थट्टा-मस्करी करणे हा तमाशातील गवळणीचा प्रमुख भाग होय. श्रीकृष्णातर्फे सोंगाड्या आणि गवळणींतर्फे मावशीबाई यात प्रमुख भूमिका बजावतात. तमाशातील गवळणीत रंग भरण्यचे काम या दोन पात्रांकडेच असते. खुमासदार संवादातून नाट्य विकसित केले जाऊन गवळणीत रंगत आणली जाते. संवादातून विनोदनिर्मिती आणि त्याला मिळालेली अभिनयाची साथ यामुळे प्रेक्षकांत हास्याची कारंजी उडतात. मधूनमधून मूळ प्रसंगाला पूरक अशा गवळणी गायिल्या जातात. आधुनिक तमाशातील गवळणींचे स्वरुप कशा प्रकारचे असते ते पुढील गवळणीवरून लक्षात येईल -

(मावशी मथुरेच्या बाजाराला जाण्यासाठी तयार होऊन येते तिच्याबरोबर ४-५ गवळणी आहेत.)

मावशी : बाजाराला कोणी काय काय माल घेतला ?

पहिली गवळण : मी घेतला बाई खवा.

मावशी : हिच्या खाण्याला कुणीब्री घ्यावा. तू गं काय घेतलं ? (मावशी दुसऱ्या गवळणीला विचारते)

गवळण : मावशी..मावशी... मी कीनई... मी कीनई... मी कीनई....

मावशी : अगं एवढं लाडात यायला काय झालं ? सांग की पटकन काय घेतलं ते.

गवळण : मी कीनई मावशी घेतलं दही.

मावशी : मग तुला गिऱ्हाईकांची कमीच नही. तू शंकाच घेतलं चंद्रिका ?

चंद्रिका : मी ! मी ना मावशी आज माझंच दूध घेतलं बाई.

मावशी : तुझं दूध ? तुझं दूध गं कोण घेणार बाजारात ? (मावशी खोचकपणे बोलते)

चंद्रिका : अगं माझं म्हण्जी माझ्या घरच्या गायीचं गं.... अर्धालीच्या गायीचं न्यारं अन् घरच्या गायीचं न्यारं दूध असतं. तर मी आज घरच्या गायीचं म्हण्जी माझंच दूध घेतलं....''[२६]

अशाप्रकारे मावशी सगळ्या गवळणींनी बाजारासाठी काय काय माल आणला याची विचारपूस करते व त्या मथुरेला बाजाराला जाण्यासाठी निघतात.

गवळणीत मावशी आणि सोंगाड्या यांचे संवादनाट्य चालत राहते. कधी कधी अशा संवादनाट्यातून अध्यात्मिक गोष्टीही सांगितल्या जातात. गवळणींचा हा कार्यक्रम फारच रंजक असतो.

तमाशात गवळण सादर करताना रंगभूषा आणि वेशभूषेकडे विशेष लक्ष दिले जात नाही. रंगभूषा, वेशभूषा आणि नेपथ्य मूळ प्रसंगाला, कथावस्तूला पूरक नसले तरी त्याच्या आस्वादात काहीच अडथळा येत नाही. नृत्य, नाट्य, संवाद, अभिनय, गीत आणि संगीत या दृष्टीने तमाशातील गवळण बहारदार असते. त्यातील सादरीकरण, नाट्य एकाचवेळी विविध अनुभूती देण्याइतपत समर्थ असते. जुन्या शाहिरांच्या गवळणी आजही बऱ्याचशा तमाशातून ऐकायला मिळतात. भारदस्त शब्दरचना, जुन्या खास संगीताचा बाज अजूनही काही औरच आहे.

गण-गवळण झाल्यानंतर लावणीला प्रारंभ होतो.

## क) लावणी :

तमाशात गण-गवळण झाल्यानंतर लावणीचा कार्यक्रम होतो. लावणी हा तमाशातील अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असा भाग आहे. प्रारंभीच्या काळात नाच्या पोऱ्याकडे हे काम असे. नाच्यापोऱ्यानंतर मात्र नाची स्त्री रंगमंचावर आली. गण झाल्यानंतर कडे व ढोलकीचा झगडा सुरु होतो. हळूहळू लय वाढू लागते. एवढ्यातच हा झगडा थांबवून एकाएकी नाचीच्या पायातील चाळांची छुमछुम सुरु होते. त्या नादातच मग ती आपला पदर उंच धरून पाठमोरी नाचत नाचत पुढे येते. पदराआडील आपल्या मुखवट्याने प्रेक्षकांचे कुतुहल चाळवीत एकदम वळून प्रेक्षकांसमोर उभी राहते. त्याचवेळी ती आपला पदर कमरेला खोवून डावा हात कमरेवर ठेवून व उजवा हात वर उभारुन मंडलाकार नृत्य करते. नंतर पुन्हा याउलट क्रिया करून दोन्ही हात कमरेवर ठेवून, कमरेत लवून हातांचे पंजे एकमेकांत अडकवून ते उलटसुलट फिरवून, हवेत उंच उडी मारुन आपले नृत्य सादर करते. त्यानंतर तिचा तमाशातील रंगेल गड्याशी संवाद सुरु होतो. या संवादातूनच लावणीला प्रारंभ होतो.

'मराठीचे लोकनाट्य-तमाशा-कला आणि साहित्य' या पुस्तकात नामदेव व्हटकर म्हणतात, ''लावणी या शब्दाचा संबंध काही लोक 'लावण्य' या संस्कृत शब्दाशी जोडून जी सौंदर्याचे वर्णन करते किंवा जी शृंगार सांगते ती लावणी असा त्याचा अर्थ करताना दिसतात. परंतु लावणीचा संबंध केवळ सौंदर्य अथवा शृंगाराशी मुळीच नाही. गुरुमार्गी किंवा कलगीतुऱ्यचे शाहीर फड आणि नवी गाणी रचून गाणाऱ्यांच्या ताफ्यात हा शब्द उत्पन्न झाला आहे. पेरणीच्या वेळच्या गीतावरून 'लावणी' हा शब्द आला आहे, असे काहींचे मत आहे. पण तसे ते

नाही. मराठी मुलुखातील पेरणी गाणे म्हणत करण्याची पद्धत नाही. पावसात, पाण्यात किंवा घात साधावी म्हणून घाईची पेरणी महाराष्ट्रात होते. तेव्हा लावणी म्हणजे शब्दांची लावण, जडण, जुळणी हेच खरे !''[२७]

पेशवेकालीन तमाशा फडातील लावणीचा कार्यक्रम हा त्या फडाचा प्रमुख भाग असे. या कार्यक्रमात प्रथम देवादिकांच्या आणि अध्यात्मिक लावण्या सादर केल्या जात व नंतर शृंगारिक लावण्या गायल्या जात. पण नंतरच्या काळात तमाशात शृंगारिक लावण्यांवरच अधिक भर दिला गेला. पेशवाईच्या अस्तानंतर तमासगीर पोट भरण्यासाठी प्रेक्षकांच्या आवडीनिवडीनुसारच तमाशा करू लागले. केवळ मनोरंजनाचा हेतू समोर ठेवून तमाशाचा फड उभे करू लागले. त्यामुळे शृंगारिक लावणी रंगमंचावर आली. 'तमाशा म्हणजे शृंगार' असा समज रुढ झाला तो कायमचाच.

या काळात लावणीच्या सादरीकरणाच्या पद्धतीवरुन शाहिरी लावणी, बैठकीची लावणी, महारी लावणी किंवा तमाशाची लावणी असे काही प्रकार प्रचलित झाले.

गेल्या शे-दोनशे वर्षात महाराष्ट्रात ही लावणी आणि तिच्या मूळच्या चाली कुणी टिकविल्या असतील तर मुख्यत: महार आणि मांग जातीने एक जुनी म्हणच आहे -

'बामणाघरी लिणं ।<br>
कुळवाड्या घरी दाणं ।<br>
महाराघरी गाणं ।'

म्हणूनच तिच्या काही चढ्या किंवा ढाल्या सुरांच्या चालींना 'महारी लावणी' असेच नाव पडले.

लावणीमध्ये प्रश्नोत्तररुपी लावण्यांना 'सवालजबाब' म्हणतात. तमासगीर त्याला 'झगडा' म्हणतात.

"'तमाशातील लावणीला 'फडाची लावणी' असेही म्हणतात. स्त्री-पुरुषांची सौंदर्यवर्णने, रुसवे-फुगवे, विरह-शृंगार लावणीतून प्रकटतात. लावणी मुख्यत: शृंगारिकच असते. लावणीची रचना अनुप्रासात्मक, आठ मात्रांची पद्मावर्तनी, सहा मात्रांची भृंगावर्तनी वृत्तात म्हणजे तालगेय जातीवृत्तात असते. ढोलकी-तुणतुणे यांच्या साथीवर ती खड्या स्वरात गायिली जाते."[२८]

लावणीचे चालीवरून मुख्यत:सहा प्रकार पडतात. ते पुढीलप्रमाणे -

१) वगाची
२) जुन्नरी
३) बालेघाटी
४) धावती किंवा झडती
५) छक्कड
६) हौद्याची

'वगाची' ही चाल वगाची कथा सांगत पुढे जाते. या वगाच्या चालीला 'म्हणणी' किंवा 'टाकणी' म्हणतात. 'जुन्नरी' लयीत गद्य घाईने म्हणावे अशी आणि 'बालेघाटी' लावणी दमदार, दु:खाची भावना सांगणारी आहे. 'धावती' लावणी वर्णनाला उपयोगी पडेल अशा पद्धतीची आहे. 'छक्कड' लावणी शृंगाराची कारंजी नाचवते. 'हौद्याची' चाल मोठमोठे गेय संवाद धुमाळीने वठवून पूर्वपक्ष,

उत्तरपक्ष करते. लावण्यांची ही नावे गायकीच्या चालीवरून जशी पडलेली दिसतात तसा प्रादेशिक स्थलनिर्देशही त्यात आहे.

लावणी नृत्यांच्या, रंगबाजीच्या कार्यक्रमात रसिक अधिक रस घेत असल्यामुळे हा कार्यक्रम अधिक लोकप्रिय बनला. या कार्यक्रमात रसिक प्रेक्षक दौलतज्यादाही करत असत. दौलतज्यादा हा प्रकार लावणी गायनाच्या वेळी चालू असतो. त्यातच फर्माईशीची भर पडली. लावणी तोडण्याचाही प्रकार सुरु झाला. विशेषत: संगीतबाऱ्यांमध्ये हा प्रकार अधिक प्रमाणात दिसून येतो. संगीतबारीची लोकप्रियता विदर्भ, मराठवाड्यात विशेष आहे. संगीतबारीला तिकडे 'संगीत-जलसा' असे म्हणतात.

या संगीतबाऱ्यांमुळे प्रेक्षकांच्या फर्माईशीप्रमाणे सिनेमातली गाणी गायिली जाऊ लागली. शृंगारिक गाण्यांवर अधिक भर देण्यात येऊ लागला. अश्लील हावभाव, चाळे करून प्रेक्षकांना आकर्षून घेण्यामुळे, तसेच तमाशातील विनोद अश्लील असतो असे लोकांचे मत झाल्यामुळे तमाशावर अश्लीलतेचा शिक्का मारला गेला तो कायमचाच !

**ड) बतावणी :**

गण-गवळणीनंतर बतावणीला सुरुवात होते. त्यालाच संपादणी, सपातणी, सबादणी, रंगबाजीही म्हणतात. काही तमाशात रंगबाजीचे स्वरुप प्रहसनात्मक असते. यालाच 'फार्स' असेही म्हटले जाते. तमासगीर लोक याला 'फार्सा' म्हणतात. हा एक प्रकारचा छोटासा फार्स असतो. कुठलेही एखादे कथानक निवडून त्यात कल्पनाविस्ताराने रंग भरला जातो. गद्य आणि पद्यमिश्रित असे स्वरुप रंगबाजीच्या किंवा बतावणीच्या या कार्यक्रमाचे असते. यात बहुधा विनोदावरच

अधिक भर दिला जातो. घटनेची गुंतागुंत करणे, खोट्याचे खरे आणि खऱ्याचे खोटे करणे आणि त्यातून विनोदनिर्मिती करणे असा प्रकार रंगबाजीत असतो. घटना नाट्याबरोबरच लावण्या, छक्कड, कटाव, झगड्यांची रेलचेल रंगबाजीत असते.

'लोकसाहित्य मीमांसा' या पुस्तकात डॉ. विश्वनाथ शिंदे म्हणतात, ''इंग्रजी नाटकांच्या अनुकरणातून मराठी नाटकात १९५६ मध्ये फार्स आला आणि तो अधिक लोकप्रिय झाला. त्याचा परिणाम म्हणून तमाशानेही त्याचे अनुकरण केले. तमासगीर त्याला 'फार्सा' म्हणतात. पठ्ठे बापूराव यांचा 'सासू-जावायाचा फार्सा' हा तमाशतील पहिला फार्सा होय. त्यानंतर 'शूर शिपायाचा फार्सा', 'बुणग्याचा फार्सा', 'गुलाबछकडीचा फार्सा', 'शेंदाड शिपायाचा फार्सा' असे अनेक फार्सा तमाशातून सादर झाले. असंभाव्य घटना, अतिशयोक्त प्रसंग आणि त्यातून व्यक्त होणारी विक्षिप्तता ही फार्साची वैशिष्ट्ये आहेत.''[२९]

''पूर्वी रंगबाजीत कथानक कुठले का असेना त्यातील पात्रे मात्र ठरलेली असत. ती म्हणजे तात्या-बापू दोघे मित्र, तात्याची किंवा बापूची बायको आणि पुण्याची नायकीण, नायकीण पुण्याचीच का ? आणि शहरसुद्धा या तमासगिरांनी पुणेच का निवडले होते ? याचे कारण पेशव्यांच्या काळात तमाशाला राजाश्रय मिळाल्यामुळे त्यांच्या पुणे राजधानीत नायकिणींचे तसेच तमाशांचे कित्येक फड आश्रयाला होते. पेशवे सरदार या नायकिणीच्या कोठ्यावर जाऊन गाणी ऐकत असत. 'बावणखणी' ही त्यासाठी प्रसिद्ध होती, हे सर्वश्रुत आहेच. पुणे हे तमासगिरांचे एकेकाळचे आश्रयस्थान म्हणून या कलावंतांनी पुणे हे शहर निवडले होते.''[३०] असे रुस्तुम अचलखांब म्हणतात.

रंगबाजीत एखाद्या लहानशा कथानकावर आधारित संवाद खुलवित यात रंगत आणली जाते. मधूनमधून लावण्याही गायिल्या जातात. सोंगाड्याचा सहभाग यात महत्त्वाचा असतो. खुमासदार संवादातून विनोदनिर्मिती करून रसिकांना हसविण्याचा प्रयत्नही रंगबाजीत महत्त्वाचा आहे. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक विषय हाताळले जात असल्यामुळे प्रेक्षकांना या कार्यक्रमात अधिक रस वाटतो. समाजातील चालीरिती, व्यावसायिक वृत्तीप्रवृत्ती, व्यक्तीस्वभावाचे नमुने इ. चे मार्मिक दिग्दर्शन रंगबाजीत साभिनय सादर केले जातात. लहान लहान विनोदी चुटके, अतिशयोक्तपूर्ण वर्णन आणि त्यातून निर्मिलेला विनोद हा रंगबाजीचा एक विशेष आहे. असा एक संवाद उदाहरणदाखल पुढीलप्रमाणे देता येईल.

तात्या व बापू नायकिणीच्या वाड्यावर येतात. तशी एक बाई लगबगीनं पुढं येते.

नायकिण : ओ पाव्हणं... ना वळख, ना पाळख, दार उघडं दिसलं अन् घुसला काय आतमधी ?....

तात्या : आमाला तुमी वळाखलं नही ? आमाला ?

नायकिण : अजिबात नही. तुमी का मोठे बाबासायब हाय का कोणी बी तुमाला वळखायला ?

बापू : आमच्या कपड्यावरून तुमाला आमची वळख पटत नाही ?

नायकिण : (अंदाज लावत) कपड्यावरून म्हणाल तर.... तुमी एखाद्या गावाचं मोठं सावकार असला पहिजे.

तात्या : छ्या.... छ्या.... छ्या....सावकार ! छ्या.... छ्या....

छ्या....

नायकिण : न्हाय, मग.... नक्कीच तुमी... गावचं पाटील तरी....

बापू : अवो.... काय बाई ? शितावरून माणूस भाताची परीक्षा करतं. अन् तुमाला आमची वळख पटेना !

नायकिण : (दोघांना पुन्हा एकदा निरखून पाहत) हां... आत्ता वळाखलं. आता मातर नक्की वळखलं बर का पाव्हणं तुमाला.

तात्या-बापू : सांगा....सांगा...

नायकिण : तुम्ही ना नक्की गावचे पांडे असणार. वळाखलं का नही ?

तात्या : नही वो बाई नही.

नायकिण : नही ? बरं आता तुमीच सांगा. मी न्हाय वळखू शकत.

बापू : म्हण्जी हारलात म्हणा की !

तात्या-बापू : आमी ना.... आमी ना बाई कोल्हापूरचे मांग हावोत.

नायकिण : (तुच्छतेने पाहत) हात् तुमच्या. मागं हायत व्हय तुमी ?[३१]

गद्य संवादाबरोबरच पद्यात्मक संवादही रंगबाजीत रंगत आणत असतात. अशा स्वरुपाच्या पद्यात्मक स्वरुपास 'झगडा' असेही म्हणतात. कधी कधी नवरा रुसून बसला आहे म्हणून बायको त्याची समजूत घालते आहे. कधी कधी बायको माहेरी जाऊन बरेच दिवस झालेत. तो तिला आणण्यासाठी जातो. रात्री मुक्कामात तो तिच्याशी बोलत नाही. तो रुसून बसतो. त्यावेळी ती त्याची समजूत घालते. तेव्हा ती म्हणते -

"रुसले का हो माझ्यावरी ।
गेले मी होते माझ्या माहेरी ।
तिकडून आली तुमची स्वारी ।
दचकून उठले झाले बावरी ।
रुसले का हो माझ्यावरी ।।धृ. ।।"[३२]

पती-पत्नीतील झगड्याप्रमाणेच सासू-जावई यांच्यातील झगडाही रंगबाजीत किंवा बतावणीत लोकप्रिय झाला आहे.

स्त्री-पुरुष यांचा झगडा रंगबाजीमध्ये काही औरच रंग भरीत असतो. कधी कधी या झगड्यामधून अध्यात्मही सांगितले जाते.

आता आपण तमाशाचे मुख्य अंग की ज्याला आज 'लोकनाट्य' म्हणून ओळखतात, त्या घटकांचा येथे विचार करू.

## ५) वग :

आधुनिक तमाशाचे मुख्य अंग म्हणजे वग. रात्रभर आठ तास तमाशा चालला तर त्यात जवळ जवळ सहा तास वगच चालतो. किंबहुना वग म्हणजेच तमाशाचे लोकनाट्य. तमाशात सादर केल्याजाणाऱ्या वगास 'लावणी' असेही म्हटले जाते. अर्थात हा 'लावणी' शब्द 'वग लावणी' असा वापरतात. म्हणजेच 'वग लावणे, कथा लावणे, आख्यान लावणे या अर्थाने तो वापरला जातो. उदा. सत्यवान-सावित्रीची लावणी', 'राजा हरिश्चंद्राची लावणी इ....'

डॉ. शरद व्यवहारे आपल्या 'लोकरंजनाची पारंपरिक माध्यमे' या पुस्तकात म्हणतात, "तमाशात वग प्रामुख्याने गोंधळ-जागरणातून आला असावा..." गोंधळ-जागणातील उत्तररंगात सादर केल्या जाणाऱ्या आख्यानाचे विषय सारखेच

म्हणजे पौराणिक कथाभागावर आधारित होते. वगातील संवाद विष्णुदास भाव्यांच्या नाटकातील संवादाशी साधर्म्य दाखवितात. तेव्हा तत्कालीन लोकजीवनात प्रचलित असलेल्या गोंधळ-जागरणातील उत्तररंग आणि विष्णुदास भाव्यांची नाटके यावरून तमासगिरांनी वगाची कल्पना घेतली असावी असे दिसते.'[३३]

यावरून तमाशातील वग हा गोंधळ-जागरण या लोकधर्मी नाट्यातून आला आहे असे दिसते.

'वग' या शब्दाची व्याख्या नामदेव व्हटकर यांनी पुढीलप्रमाणे केली आहे. ''वग हा शब्द 'ओघ' या शब्दाचे खेडवळ रुप आहे. ''बोलणं ओघाओघानं आलं'' हे वाक्य खेडवळ मनुष्य बोलू लागला तर ''बोलणं वगा-वगानं आलं'' असे तो बोलेल. अशी ओघाओघाने आलेली गोष्ट, कथानक म्हणजे 'वग'. या वगासाठी लोक इतके उत्सुक असतात की, ''अरं गण-गौळणीतच रात सरली की'' किंवा ''नमनातच दिवटीचं तेल सरलं, आता वग कवा ?'' अशा रुढ भाषेत म्हणीच बनल्या आहेत.''[३४]

अशा या वगनाट्याचा प्रारंभ १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात झाला. उमा सावळजकर या तमासगिराने आपला सहकारी बाबा मांग यांच्या सहकार्याने 'मोहना-बटाव' हा पहिला वग रचला. उमा-बाबाजीचा 'मोहना-बटाव' हा वग १८६०-७० च्या सुमाराला रचला गेला आणि त्याचे खेळ चालू झाले असले पाहिजेत.'[३५] अशी माहिती तात्या सावळजकरांचा मुलगा शंकर यांनी दिली आहे.

'मोहना-बटाव' हा वग म्हणजे आजच्या वगनाट्याची ती आरंभीची अवस्था होती. त्यात पद्यात्मक भाग अधिक असल्यामुळे संवादातील नाट्य अभावानेच आढळते. 'मोहना-बटाव' या वगानंतर पठ्ठे बापूराव यांनी 'मिठ्ठाराणीचा

वग' लिहिला. तो आजही प्रसिद्ध आहे. भाऊ पक्कड यांचा 'राजा हरिश्चंद्र' व पठ्ठे बापूराव यांचा 'मिठ्ठाराणी' हे वग त्याकाळी अधिक लोकप्रिय होते.

पुढे हरिभाऊ वडगावकर यांचा 'गाढवाचं लग्न' हा वग व दादू इंदूरीकर यांचा 'गाढवाचं लग्न' हा वगही अधिक लोकप्रियता मिळवून गेला. वगाची परंपरा पुढे चालविणाऱ्यात दगडूबाबा साळी शिरोलीकर, दत्तोबा तांबे शिरोलीकर, अर्जुनबाबा वाघोलीकर, शिवा-संभा कौलापूरकर, रामा कुंभार वर्धनगडकर भाऊ-बापू (मांग) नारायणगावकर यांची कामगिरी मोलाची आहे. अलीकडे शाहीर साबळे शाहीर अमरशेख, शाहीर अण्णा भाऊ साठे, आनंद यादव, रा.रं. बोराडे, द.मा. मिरासदार, वसंत सबनीस यांनीही बरीच वगरचना केलेली आहे असे दिसते.

वगाच्या सुरुवातीस वगाच्या कथानकाचा परिचय करून देणारी लावणी गायिली जाते. या लावणीतून-कवनातून वगाचे कथानक थोडक्यात सांगितले जाते. या लावणीस 'टाकणी' किंवा 'शिलकार' म्हणतात. हा शिल्पकार तमाशातील प्रमुख गातो. तमाशातील प्रमुखास 'सरदार' म्हटले जाते. तो प्रामुख्याने वगातील कथानकातील प्रमुख भूमिका करतो. सरदाराने शिलकार गायले की बाकीचे त्याला साथ देतात.

वग म्हणजे एक प्रकारचे नाटकच असते. वगातले काही संवाद गद्यात तर काही पद्यात असतात. म्हणजे वगनाट्य हे एक प्रकारचे चंपूनाट्यच असते. हे वग पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक. राजकीय इ. प्रकारचे असतात. यातील एखाद्या कथानकावर आधारित नाट्य सादर केले जाते. हे वग लिखित नसतात. फक्त कथानक लक्षात घेऊन त्यातील पात्रे व त्यांची भाषणे ठरवून घटना आणि प्रसंग यांना पूरक संवाद स्वयंस्फूर्तपणे व प्रसंगानुरुप सादर केले जातात. त्यामुळे त्यात एक

प्रकारचा स्वाभाविकपणा येतो. कलावंताचा हजरजबाबीपणा यात महत्त्वाचा असतो.

२० व्या शतकाच्या पूर्वार्धात विशेषत: म. फुले यांच्या 'सत्यशोधकी जलशा'त व नंतरच्या 'आंबेडकरी जलशा'त सामाजिक प्रबोधन करणाऱ्या वगांचा समावेश असे. त्यांचा बाज पारंपरिक पण आशय मात्र आधुनिक, वर्तमानकाळाशी अनुबंध जोडणारा असे. सामान्य माणसाला व त्यांच्या जीवनाला वगामध्ये महत्त्व आहे. शाहीर साबळे यांनी 'नशीब फुटके सांधून घ्या', 'ग्यानबाची मेख', 'संयुक्त महाराष्ट्र आणि द्विभाषिक' यावर आधारलेले तसेच 'यमराज्यात एक रात्र', 'कशी काय वाट चुकला' यासारखे शहरी जीवनातील मध्यमवर्गीय लोकांच्या जीवनावर आधारित लोकनाट्ये सादर केली. अण्णा भाऊ साठे यांच्या 'मुंबई कोणाची ?' मध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे वर्णन आढळते. तर विश्वासराव फाटे यांच्या 'सात दिवसांचा राजा'मध्ये शेतकरी कामगारांच्या राज्याचे स्वप्न रेखाटले आहे. त्याबरोबरच 'अकलेची गोष्ट', 'लोकमंत्र्याचा दौरा', 'पुढारी पाहिजे', 'आंधळं दळतंय', 'खणखणपूरचा राजा', 'विच्छा माझी पूरी करा', 'कथा अकलेच्या कांद्याची', 'लवंगी मिरची कोल्हापूरची' इ. वगनाट्ये अधिक लोकप्रिय झाल्याचे दिसते.

वगनाट्य हे खरेखुरे दृक आणि श्राव्यनाट्य आहे. संवादनाट्य म्हणूनही वगाचे विशेष महत्त्व आहे. वगातून अनेक लोकधर्मी तत्त्वाचा अविष्कार घडतो. त्यामुळे वगाला अफाट अशी लोकप्रियता लाभली. लोकरंजनाचे, लोकशिक्षणाचे ते एक प्रभावी माध्यम आहे, असे म्हणता येते. कोणत्याही प्रकारचा वग असला तरी त्यात असंभाव्य व अतिशयोक्त घटना, कार्यकारणभावाचा अभाव, भावनांचे

भडक प्रकटीकरण, पात्रांच्या विक्षिप्त वर्णनातून निर्माण होणारा विनोद, उघड व थेट चित्रणातून येणारी अश्लीलता, शाब्दिक कोट्या व सामाजिक आणि नैतिक संकेताबद्दलची बंधने सैल करणारी विमुक्तता हे विशेष आढळतातच.

**३) तमाशातील वाद्ये :**

तमाशातील मुख्य वाद्ये म्हणजे ढोलकी, तुणतुणे, हलगी किंवा कडे आणि झांज. या चारींच्या वाद्यमेळ्यात नाचीच्या पायातील चाळांचीही भर पडते. या प्रत्येक वाद्याची माहिती पुढीलप्रमाणे -

**अ) ढोलकी -**

ढोलकी हे तमाशातील महत्त्वाचे वाद्य आहे. दक्षिणेतील मृदुंग, खोळ याहून ती वेगळी आहे. मृदंगाचे एक टोक लहान करत नेलेले असते. तसेच तमाशातील ढोलकीचे काहीवेळा ते थोडेसे लहान केलेले दिसते. मृदंगाच्या आवाजात एक दमदारपणा आहे. तर ढोलकीत कडक फडकतेपणा आहे.

साधारण दोन-सव्वादोन फूट लाकूड पोखरुन हे खोड बनविलेले असते. हे खोड बहुधा शेळी, बोकड यांच्या निम्म्या कमविलेल्या कातड्याने मढविलेले असते. धिमपुडा रुंद आणि शाईपुडा अरुंद असतो. बऱ्याच वेळा तमाशाची ढोलकी सरळ समारंतरही असलेली आढळते. शाईकडचा पुडा लोखंडी कड्यावर आवळलेला आणि तो धिमपुड्याला सुताच्या दोरीने जखडलेला असतो. तमाशा ढोलकीचा स्वर दोरीच्या तिढ्यात बारीक खुंट्या घालून, त्यांनी दोरीचा पीळ वाढवून खालीवर नेतात.

महाराष्ट्रीय ढोलकी ही पंजाबी ढोलकीहून वेगळी आहे. तमाशा लावणी खड्या आवाजातील असल्यामुळे ढोलकीही चढ्या स्वरातीलच आवाज देते. अशी ही तमाशा ढोलकी मृदंगापासून बनत गेलेली, पण दक्षिणेतील तालवाद्यापेक्षा आणि उत्तरेतील ढोलकीपेक्षाही वेगळी आहे.

**ब) तुणतुणे –**

तुणतुणे लाकडी मापट्याला, खालच्या तोंडाला कातड्याने मढवून तयार केलेले असते. मापट्याच्या मध्यावरून बारीक तार वर घेतलेली असते. मापट्याच्या बाजूला दोन-अडीच फुटाची तिरकस दांडी बसवून तिच्या वरच्या टोकाच्या खुंटीला ती तार गुंडाळलेली असते. ही दांडी हातात धरून, त्याच हाताच्या बोटाने-नखाने तुणतुणे वाजवतात. तुणतुण्याच्या टोकाला रंगीत रुमाल बांधलेला असतो. तुणतुणे वाजविणारा सुरत्या असतो. गाण्याचे पालुपद पुढे चालवित तो तुणतुणे वाजवित असतो.

**क) हलगी किंवा कडे :**

हलगी हे वाद्य शाहिरांच्या डफापासून तमाशात आले. पण डफापेक्षा हलगीचा आवाज कडक आणि टणक असतो. हे एक साधे वाद्य आहे. साधारण: मोठ्या ताटाच्या आकाराचे हे वाद्य लाकडी किंवा लोखंडी कड्यावर कातडे मढवून तयार केलेले असते. तमाशात विशिष्ट प्रसंगीच या वाद्याचा उपयोग केला जातो. त्यामुळे तमाशात कडाक्याचा रंग भरला जातो.

तमाशाच्या मुख्य सरदाराजवळ ही हलगी असते. ही हलगी तो छातीच्या डाव्या बाजूला उभी धरून तिच्यावर उजव्या हाताची थाप देऊन वाजवितो.

हलगीच्या खाली तो डाव्या हाताच्या पंजाने बोटात लहान काडी धरून त्या काडीने हलगीवर आघात करूनही तो हलगी वाजवितो. त्यामुळे काडीच्या आघाताने व उजव्या हाताच्या थापेने हलगीतून कडक आवाजाचे संगीत निर्माण होते. या हलगीला 'कडे' असेही म्हणतात.

**ड) झांज –**

तमाशातील झांज गोंधळातून तमाशात आली आहे. भजनी टाळापेक्षा ही झांज थोडीशी वेगळी असते. यात साधारण दोन इंच व्यासाची नादमय अशी वाजवायची दोन पाळी असतात. ही झांज तुणतुणे वाजविणाऱ्या सुरत्याच्या जोडीचा दुसरा सुरत्या वाजवित असतो.

ढोलकी, तुणतुणे, कडे किंवा हलगी आणि झांज यांच्या संगीताच्या मेळ्यात जेव्हा नाची थयथय नाचत रंगमंचावर येते तेव्हा तिच्या पायातील चाळांचा झनकार, छुनुक–छुनुक असा आवाज कानाला एकप्रकारचे नादमाधुर्य देतो. लहान लहान घुंगरांनी बनविलेले हे चाळ एका वेगळ्या संगीताचा अनुभव देतात.

तमाशातील या वाद्यांना एक आगळे–वेगळे असे वैशिष्ट्य आहे. तमाशातून सादर केल्या जाणाऱ्या लावणीचे सौंदर्य खुलविण्यात ही वाद्ये महत्त्वाची कामगिरी करतात. ही वाद्ये मराठी मनाचे, मराठी जीवनाचे आणि संस्कृतीचे प्रतीक आहेत. रंगेल आणि रांगड्या मनातील भावना संगीत सूरातून व्यक्त करण्याचे सामर्थ्य या वाद्यात आहे. लोककला प्रकारात तमाशाला जे एक वेगळेपण लाभलेले आहे, त्याचे एक कारण म्हणजे तमाशातील ही वाद्ये होत. तमाशा या अस्सल मऱ्हाटी कला प्रकाराला साजेशीच अशी ही वाद्ये आहेत.

आता तमाशामध्ये कोणकोणती पात्रे असतात याचा विचार करू.

**४) तमाशातील पात्रे :**

तमाशा हे जनसामान्यांच्या मनोरंजनाचे एक साधन आहे. ग्रामीण जनतेची करमणूक करून त्यांच्या मनावरील ताण दूर करण्याची कामगिरी तमाशा करीत असतो. तमाशा हे दृक आणि श्राव्य स्वरुपाचे एक नाटक असल्यामुळे प्रेक्षक त्यात रस घेत असतो. नृत्य, संगीत आणि नाट्य असे काहीसे स्वरुप तमाशाचे आहे.

**अ) नाची –**

नाची हे तमाशाचे मुख्य आकर्षण आहे. तमाशात नृत्य करणाऱ्या स्त्रियांना नाचीच म्हटले जाते. नाच नाचते ती नाची. असा अस्सल मराठी अर्थ 'नाची' या शब्दाला लाभला आहे.

तमाशात नाचीचा प्रवेश होण्यापूर्वी नाचण्याचे काम नाच्याच करीत असे. पण पेशवाईच्या अखेरच्या काळात नाचणाऱ्या नाच्या स्त्रियांचा प्रवेश तमाशात झाला आणि आपल्या नाचाने त्या प्रेक्षकांना गुंगवू लागल्या. पेशवाईत लावणी म्हणणाऱ्या स्त्रिया होत्या. पण त्या तमाशात भाग घेत नसत. बैठकीच्या कार्यक्रमात त्या बैठी लावण्या गात असत.

तमाशात प्रथम कोल्हाटणींचा नाचण्यासाठी प्रवेश झाला. वाघ्या-मुरळीच्या जागरणातील मुरळीची परंपरा, नृत्य, गायन करणाऱ्या कोल्हाटणी आणि पेशवाईत उत्तरेकडून आलेल्या गायिका व नर्तिका यांच्या परंपरेतून तमाशात स्त्री आली. पठ्ठे बापूरावांच्या फडात पवळा नावाच्या नाचीने तर सर्व लोकांची मने जिंकली होती.

तमाशातील नाचीच्या नाचाचा स्वतंत्र असा घाट, ढब, वळण आहे. रंगमंचावर प्रथम प्रवेश करताना ती आपला चेहरा प्रेक्षकांना न दाखविता आपले दोन्ही हात उभारुन आपल्या पदराचा पडावाच्या शिडासारखा आकार करून प्रेक्षकांकडे पाठ करून ती नाचतच रंगमंचावर येते. ढोलकीच्या ठेक्यावर ती नाचते.

तमाशातील नाची पायाचा अंगठा आणि त्याजवळचा चवड्याचा भाग प्रथम चटकन पुढे सरकविते आणि टाचेच्या तालावर आघात देते. त्यामुळे तिच्या पायातील चाळांचा मधुर आवाज येतो. लीलयेने गिरक्या घेत, शरीराचा तोल सांभाळत ती नाचत असते. नाची तालात लांब लांब पावले टाकून नाचत फिरते तर कधी घोड्याचा लगाम धरल्याचा अभिनय करून घोडदौडीचा नाच करते. तिच्या नाचात एक अत्यंत विलक्षण गती असते. स्वाभाविकपणा असतो. लुगड्याच्या पदराबरोबरच शरीराच्या हालचालीची सांगड ती आपल्या नाचात घालते. तिच्या नाचाच्या अनेक तऱ्हा आहेत. तमाशातल्या आपल्या नाचात नाची आपले शरीर अत्यंत चंचल ठेवून संबंध शरीराला ती नाचात सहभागी करते. हाताबोटांच्या आणि डोळ्यांच्या हालचाली यामुळे तिच्या नाचात एक विलक्षण सौंदर्य येते.

तमाशातील नाचीचा आणखी एक विशेष म्हणजे ती नाचता नाचता उंच स्वरात गातही असते. नाच आणि गाणी ही दोन्ही कामे अत्यंत लीलयेने करताना ती दिसते.

**ब) सोंगाड्या –**

तमाशाचे मुख्य आकर्षण म्हणजे त्यातील नाची व सोंगाड्या. या दोघांमुळेच तमाशाला रंगत येते. त्यातल्या त्यात सोंगाड्या हा तमाशातील महत्त्वाचा घटक होय.

संस्कृत नाटकातील विदुषकाशी सोंगाड्याची परंपरा सांगता येते. विदुषकाचे हे पंरपरेने चालत आलेले पात्र म्हणजे आजच्या तमाशातील सोंगाड्या होय. तमाशात गण-गवळण झाली की नाची मावशीबाईला हाक मारते आणि मिशा असलेला पुरुष वेशातील सोंगाड्या डोक्यावर धोतराचा सोगा पदर म्हणून घेत रंगमंचावर येतो. त्याचा तो अवतार बघूनच प्रेक्षक हसतात आणि मग त्याच्या बोलण्याने, हावभावाने, शारीरिक हालचालीने हास्याची कारंजी प्रेक्षकांत उडतात.

तमाशातील सोंगाड्याची भूमिका करणे अत्यंत अवघड पण सोंगाड्या अत्यंत लीलयेने ही कामगिरी पार पाडत असतो. नाट्यकलेत गंभीर भूमिका करण्यापेक्षा विनोदी भूमिका करणे अवघड व चातुर्याचे काम असते. तमाशात लिखित कथानकाला, भाषणाला मुळीच वाव नसतो. घटना, प्रसंग, प्रेक्षक, प्रदेश आणि लोकजीवन लक्षात घेऊन सोंगाड्याला बोलायचे असते. तो आपल्या बोलण्याने, अभिनयाने, अंगहुशारीने, चातुर्याने तमाशात रंगत आणून प्रेक्षकांना हसवित असतो.

सोंगाड्या, हुशार, चतुर व वाक्‌बगार असावा लागतो. तो आपल्या कल्पनेने एखादा प्रसंग आहे तसा डोळ्यासमोर उभा करत असतो. ते ही केवळ बोलण्यातून त्याच्याजवळ हजरजबाबीपणा असावा लागतो. त्यामुळेच सोंगाड्याचे तमाशातील काम हजरजबाबीपणाचे, औचित्य साधणारे, वेळ-प्रसंगाला साजरे करणारे असते.

तमाशात विनोदनिर्मिती करून प्रेक्षकांना हसविण्याचे काम सोंगाड्या करतो. ही कामगिरी कधी शाब्दिक कोट्या करून, कधी द्वैर्थी शब्दयोजना करून, तर कधी दृश्य स्वरुपाच्या विनोदनिर्मितीत सोंगाड्याचे शारीरिक हावभाव, शारीरिक

15392

हालचाली, त्याच्या गमती-जमती यांना विशेष महत्त्व आहे. नाचीची थट्टा-मस्करी करीत करीत सोंगाड्या प्रेक्षकांना हसवितो.

प्रासंगिक दृश्य माध्यमातूनही तो विनोद करीत असतो. उदा. तमाशातील राजाला बसायला सिंहासन म्हणजे सोंगाड्याने ओणवे होणे आणि राजाने त्याच्या पाठीवर बसणे. राजा शिपायांवर रागावून उठून ताडताड बोलून रागाने सिंहासनावर आदळून बसतो. तेव्हा सोंगाड्या तेथून दुसरीकडे सटकतो व राजा धपकन खाली पडतो आणि प्रेक्षक हसतात.

कधी कधी अर्थाला चटकन कलाटणी देऊनही सोंगाड्या प्रेक्षकांना हसवितो. अशा स्वरुपाचा एक विनोद असा -

''सोंगाड्या आणि नाची नवरा-बायको बनून रंगमंचावर येतात. सोंगाड्या आपल्या बायकोला झाकत-लपवतच समोर आणतो. त्यातूनही ती समोर पाहते. सोंगाड्या एकदम तिला दटावून म्हणतो,

''ए लोकांच्याकडं काय बघतेस ?'' तेव्हा ती म्हणते

''न्हाई वो, ही समोर बसलेली सगळी माणसं मला बापासारखी आहेत.'' सोंगाड्या एकदम कपाळावर हात मारतो आणि डोळे विस्फारुन म्हणतो, ''तुझ्या आईचा संबंध या सगळ्या माणसांच्याबरोबर आहे ?''[३६]

अर्थातच अशा स्वरुपाचा विनोद अश्लीलतेकडे झुकताना दिसतो. पण प्रेक्षक या विनोदाने खळाळून हसतात. यावरून सोंगाड्या हा एक गुणी कलावंत आहे असेच दिसते.

तमाशात दृश्य स्वरुपाच्या विनोदावर अधिक भर दिला असला तरी मार्मिक स्वरुपाचा विनोदही तमाशात आढळतो. व्यक्तीचा स्वभाव, व्यावसायिक दोष, व्यवसायातील काही लकबी, समाजजीवनातील काही घटनाप्रसंग यातूनही विनोदनिर्मिती साधली जाते. तमाशातील विनोद स्वाभाविक स्वरुपाचा असून त्याची निर्मिती सहजपणे होत असते. त्यामुळे एक प्रकारचा जिवंतपणा त्यात आलेला असतो.

**क) मावशी –**

राधा आणि इतर गौळणींसोबत जी एक वयस्कर गौळण असते तीच मावशीबाई. मथुरेच्या बाजाराला जाताना कृष्ण आणि त्याचा सवंगडी पेंद्या गौळणींची वाट अडवतो. त्यावेळी तरुण गौळणींची प्रतिनिधी म्हणून मावशी त्याच्याशी भांडते आणि गौळणींचे प्रतिनिधीत्व करते. तमाशातील मावशीबाईची भूमिका तमाशातील वयस्कर स्त्रीच करते. ज्या तमाशाच्या संचात या भूमिकेसाठी नाची स्त्री उपलब्ध नसेल तेथे पुरुषच मावशीबाईची भूमिका करतो.

**ड) सुरत्ये किंवा झिलकरी –**

तमाशात साधारणतः दोन सुरत्ये असतात. त्यांनाच झिलकरी असे म्हणतात. ह्या सुरत्यांजवळ झांज व तुणतुणे ही वाद्ये असतात. तमाशात ते या वाद्यांची साथ देऊन मधून-मधून सूर देतात. तमाशात सूर देण्याचे काम त्यांच्याकडे असते म्हणून त्यांना सुरत्ये असे नाव पडले असावे. तमाशात गाणे चालू असताना त्यांचा सूर धरणे, गाण्याचे पालुपद उचलणे, त्याचबरोबर 'राम हो ऽ रामा हो', 'जी-जी-जी-हे जी-जी', 'अगं नारी तू गं' असे शब्दप्रयोग ते झील धरण्यासाठी वापरतात.

सुरत्यांचा आवाज कडक असतो. त्यांच्या आवाजाने आणि झील धरण्याने तमाशातील गाण्यांना एक वेगळी रंगत येते.

**इ) सरदार –**

तमाशातील आणखी एक महत्त्वाचे पात्र म्हणजे सरदाराचे काम करणारा कलावंत. तो आकर्षक शरीरयष्टीचा, अभिनयकुशल आणि पहाडी आवाजात गाणारा असा असावा लागतो. हा सरदार तमाशा फडाचा मुख्य असतो. या सरदारालाच 'नाईक' असेही म्हटले जाते.

एकूणच, तमाशा करून दाखविणाऱ्या मंडळींना 'तमासगीर' म्हणतात. सात-आठ किंवा त्याहून अधिक पात्रांच्या संचाला 'फड' म्हणतात. स्त्रीवेशभूषा करणारा नाच्या किंवा नाची स्त्री असते. शाब्दिक कोट्या करून वेडेवाकडे अंगविक्षेप करून प्रसंगी अचकटविचकट बोलून हास्यनिर्मिती करणारा हजरजबाबी सोंगाड्या असतो. सरदार, सोंगाड्या आणि नाची या त्रयींवर तमाशाचे यश अवलंबून असते. तमाशात या त्रिमूर्तीला अधिक महत्त्व असते. याशिवाय तमाशामध्ये ढोलकी व तुणतुणे वाजविणारे दोन साथीदार असतात आणि मागे उभे राहून 'जी-जी' म्हणणारे, सूर ओढणारे सूरते किंवा झिलकरी असतात. असे एकूण सात-आठ पात्रांचा मिळून तमाशा तयार झालेला असतो हे तमाशाचे स्वरुप पेशवाईच्या काळात होते.

अलीकडे तमाशाचे रुपांतर लोकनाट्यात झाल्यामुळे त्यातील पात्रांची संख्याही बेसुमार वाढली. पूर्वीच्या सात ते आठ पात्रांवरून ही संख्या तीस ते चाळीसवर गेली दिसते. असे आजच्या तमाशाचे स्वरुप आहे.

## तमाशाचे प्रकार :

तमाशाचे सादरीकरण, त्यातील गायन आणि प्रदेशविशेष यांच्या आधारे तमाशात आलेल्या वेगळेपणामुळे तमाशाचे विविध प्रकार पहावयास मिळतात. साधारणपणे पश्चिम महाराष्ट्रात आणि मराठवाड्यात सादर होणाऱ्या ढोलकी फडाच्या तमाशाने आपले प्रादेशिक वेगळेप्ण जपले आहे. विदर्भात सादर केला जाणारा तमाशा 'खडी गम्मत' म्हणून ओळखला जातो. तर महाराष्ट्रातील खानदेशात केल्या जाणाऱ्या तमाशाला 'खानदेशी तमाशा' म्हणतात.

साधारणपणे 'ढोलकीचा तमाशा' आणि 'संगीत तमाशा' किंवा 'संगीतबारीचा तमाशा' असे मुख्य दोन प्रकार पहावयास मिळत असले तरी खानदेशी तमाशा, वानदेशी तमाशा, खडीगम्मत, कोल्हाटणीचा तमाशा असेही काही प्रकार तमाशात आढळतात. सुरुवातीला आपण पश्चिम महाराष्ट्रातील आणि मराठवाड्यातील तमाशाचे स्वरुप आणि वैशिष्ट्ये पाहू.

### अ) ढोलकी फडाचा तमाशा :

तमाशाची खरी सुरुवात पश्चिम महाराष्ट्रात झाली असल्यामुळे तमाशा फडाचे सर्वाधिक प्रमाण याच भागात अधिक पहावयास मिळते. तर मराठवाडा ही संतांची भूमी असल्यामुळे तेथे हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच फडांची संख्या आढळते.

पश्चिम महाराष्ट्रातील तमाशाला 'तमाशा' हेच नाव असून अलीकडे त्याला 'लोकनाट्य' असे म्हटले जाते. या प्रदेशातील तमाशाला 'ढोलकी फडाचा तमाशा' असेही म्हटले जाते. या तमाशाचे ढोलकी हे महत्त्वाचे वाद्य असते. या तमाशात

स्त्रियाच नाचण्याचे काम करतात. या तमाशा फडात ५० ते ६० कलावंत मंडळी व इतर मंडळी असतात.

पश्चिम महाराष्ट्रातील तमाशात प्रथम गण सादर केला जातो. नंतर फार्स व शेवटी वग सादर केला जातो. वगामध्ये पद्यापेक्षा गद्यात्मक संवादाला अधिक महत्त्व दिले जाते. ग्रामीण माणसाला समजेल अशा भाषेतच वग सादर केला जातो.

महाराष्ट्रातील तमाशा-लोकनाट्याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतात:-

१) पूर्वरंग आणि उत्तररंग अशी सादरीकरणातील विभागणी
२) विशिष्ट प्रकारची वाद्ये-ढोलकी, झांज, तुणतुणे, कडी आणि घुंगरे.
३) गण-गौळण आणि लावणी.
४) नाचीचा वैशिष्ट्यपूर्ण नाच.
५) मावशी-सोंगाड्या.
६) वग
७) लोकनाट्याची विशिष्ट अशी धाटणी

या सर्व वैशिष्ट्यांमुळेच 'तमाशा' हा 'तमाशा' म्हणून ओळखला जातो.

## ब) संगीतबारीचा तमाशा :

या तमाशास 'बारीचा तमाशा' असेही म्हटले जाते. या तमाशात नाचाला अधिक महत्त्व दिले जाते. अभिनयाला कथात्मकतेला यामध्ये स्थान नसते. यामध्ये पाच ते सहा नाचणाऱ्या स्त्रियांचा सहभाग असून त्यातली एक स्त्री या बारीची प्रमुख असते. या प्रमुख स्त्रीच्या नावानेच ही बारी ओळखली जाते. अशी बारी एखाद्या गावात कायमस्वरुपी चालविली जाते. तसेच जत्रेतूनही अशा बारीचे कार्यक्रम

होतात. साधारणत: बैठकीच्या स्वरुपात ही बारी असते. त्यामुळे प्रेक्षक मर्यादित असतो. बारीत पाच ते सहा स्त्रिया बसलेल्या असतात. प्रेक्षकांच्या इच्छेप्रमाणे त्यातील स्त्रिया नृत्य करून किंवा बसूनच गाणी गातात. पूर्वीच्या लावण्यांऐवजी आता यामध्ये हिंदी-मराठी चित्रपटातील गाणी सादर केली जातात. या नृत्यगीताला पेटी, तबला, कडी या वाद्यांची संगीतसाथ असते. संगीतासाठी पेटीमास्तर, तबलची व कडी वाजविणारा असा वाद्यवृंद असतो. संगीतबारीत संवाद आणि सोंगाड्या यांना विशेष महत्त्व नसते.

दौलतज्यादा करून, अधिकचे पैसे देऊन गाणे तोडण्याचा प्रकार संगीतबारीत वारंवार चालतो. त्यामुळे संगीतबारीला 'दौलतज्यादा' व 'इष्कबाजीचे' स्वरुप येते. या बारीचा प्रेक्षक सधन, हौशी व रंगेलवृत्तीचा असतो. त्यामुळे प्रेक्षकांच्या आवडीचा, अभिरूचीचा विचार संगीतबारीत केला जातो.

तमाशाचा एक प्रकार म्हणून संगीतबारी आज ओळखली जात असली तरी तमाशा या लोकनाट्याची लक्षणे संगीतबारीत आढळत नाहीत. केवळ त्यातील नाचगाण्यामुळे संगीतबारीला तमाशा म्हटले जाते.

### क) खानदेशी तमाशा :

खानदेश म्हणजे धुळे आणि जळगाव जिल्ह्याचा भाग होय. महाराष्ट्रातील खानदेश हा प्रदेश आपल्या सांस्कृतिक आणि भाषिक वैशिष्ट्यांमुळेच इतर प्रदेशांहून वेगळा आहे. या प्रदेशातील बोलीभाषा अहिराणी असल्यामुळे तर हे वेगळेपण चटकन लक्षात येते. या भागात तमाशा फडांची संख्या फारच कमी आढळते. खानदेशात तमाशात स्त्रियांना नाचवण्याची प्रथा नसल्यामुळे नाचे पोरे तमाशात

नाचवले जातात. नाचत असतानाच ते दौलतज्यादा स्वीकारतात. त्यामुळे खेळात खंड पडतो.

खानदेशी तमाशामध्ये गद्यात्मकतेपेक्षा पद्यात्मक संवादाला अधिक महत्त्व असते. यामध्ये लावणीऐवजी हिंदी गीते असतात. ढोलकी वेगळ्या प्रकारची असते. ढोलकी फडातल्याप्रमाणे सवालजबाब नसतात. या तमाशातून गायल्या जाणाऱ्या गाण्यांची एक विशिष्ट सारणी, ढब असते. ढोलकी तमाशाप्रमाणेच खानदेशी तमाशात गण, गौळण, बतावणी आणि वग सादर केला जातो. वग कथागीतात्म असतो. खानदेशी तमाशात वग सादर करण्याअगोदर थोडक्यात कथानक सांगितले जाते. त्याला 'सखी' असे म्हणतात.

वगाच्या वेगवेगळ्या चालीही या तमाशात आढळतात. हे वग पद्यात्मक असतात. प्रत्येक पद्याच्या शेवटी 'रामा हो रामा जी' ही झील असते. खानदेशाच्या लोकजीवनातील महत्त्वाचा उत्सव म्हणजे 'कानबाईचा उत्सव.' जत्रा, उत्सवप्रसंगी या भागात तमाशाचे कार्यक्रम होतात. या तमाशात सवाल-जबाबाऐवजी झगडा असतो.

### ड) विदर्भातील तमाशा : 'खडी गम्मत'

सर्वांसाठी खुल्या असणाऱ्या कोणत्याही खेळाला पूर्वी 'गम्मत' असे म्हटले जात असे. विदर्भात (वऱ्हाड प्रांत) तमाशाला 'खडी गम्मत' म्हणतात. तमाशाच्या खडी गम्मत या प्रकारात नाचगाण्यावर अधिक भर दिलेला असतो. त्यातील संवादही गीतात्मकच असतात. गद्यात्मक संवादापेक्षा संगीतावर अधिक भर असतो. या खेळाचे स्वरुप एखाद्या संगीतबारीसारखे असते.

'खडी गम्मत' या प्रकारात सात ते आठ कलावंत असतात. दोन-तीन नाच्या असतात. काही 'खडी गम्मत'च्या पथकात स्त्री नाचीऐवजी पुरुष नाच्याही असतो. यामध्ये लावण्या, पोवाडा, छक्कड यासारख्या रचना नृत्याभिनयासह सादर केल्या जातात. यातील संवाद गीतात्मक, खटकेबाज व खुमासदार असतात. त्यामुळे या प्रकाराच्या तमाशाला एक प्रकारचा रंगतदारपणा येतो. विदर्भात जत्रा, उत्सव प्रसंगी तसेच फावल्या वेळात लोकरंजनासाठी 'खडी गम्मत'चे आयोजन केले जाते. सध्या या तमाशाप्रकारातून चित्रपटाची गाणी, अश्लील विनोद यासारखे प्रकारही सादर होताना दिसतात.

## इ) कोल्हाटणीचा तमाशा :

गावातील लोकांच्या मनोरंजनासाठी तसेच स्वत:च्या उपजिविकेचे एक साधन म्हणून कोल्हाटी जातीतील कांही कुटुंबात स्त्रियांनी नाचगाणे करण्याची एक परंपरा प्रचलित होती. आजही ती काही प्रमाणात प्रचलित आहे, टिकून आहे. गावातील उत्सव, जत्रा, श्रीमंत घराण्यातील लग्नविधी अशा प्रसंगीही कोल्हाटणी नाचवल्या जात असत.

या तमाशाचे स्वरुप संगीतबारीसारखे असते. या तमाशाचा प्रेक्षकही मर्यादित असतो. प्रेक्षकांच्या आवडी-निवडीप्रमाणे, मागणीप्रमाणे यात नाचगाणी सादर केली जातात. त्यातून त्यांना बिदागीही चांगली मिळते. ढोलकी, पेटी, कडी आणि पायातील चाळ या संगीताच्या साथीवर गाणी नृत्याभिनयासह गायली, सादर केली जातात.

तमाशाचा जन्म होण्यापूर्वीपासूनच कोल्हाटणीच्या तमाशाची परंपरा प्रचलित होती. या तमाशात नाच-गाण्याला अधिक प्राधान्य दिले जाते. पूर्वी कोल्हाटणींच्या

तमाशामधून लावण्या सादर केल्या जात असत. आता मराठी-हिंदी चित्रपटातील गाणी या तमाशातून सादर केली जातात. तमाशाच्या जडणघडणीत कोल्हाटणीच्या तमाशाचा महत्त्वाचा वाटा आहे. तसेच लोकरंजनाचे पारंपरिक माध्यम म्हणून लोकपरंपरेत या तमाशाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले होते.

**फ) तख्ती तमाशा :**

मराठवाड्यातील काही भागात विशेषत: परभणी,जालना आणि औरंगाबाद जिल्ह्यातील कांही गावात सण, उत्सव प्रसंगी तख्ती तमाशा सादर करण्याची प्रथा आहे. या तमाशाचा रंगमंच म्हणजे बैलगाडीवर बांधलेला तख्त. तख्त म्हणजे जाड फळ्यांचा मोठ्या आकाराचा लाकडी पलंग. या मंचाला रंगीत कापडांनी सजवितात. या तख्तावर रंगमंचावर एक-दोन नाची (कोल्हाटणी) आणि दोन-तीन वादक उभे राहून नृत्य गायनाचा कार्यक्रम करतात. गावातून ही बैलगाडी मिरवत-मिरवत जत्रेच्या, उत्सवाच्या ठिकाणी येते. चालत्या गाडीत नृत्य-गायनाचे कार्यक्रम होत असल्याने गावातील लोक आपल्या अंगणात उभा राहूनदेखील या तमाशाचा आनंद घेत असतात. चालत्या गाडीसोबत हौशी तरुणांचा समुदायही असतो. ‘चालता-फिरता तमाशा’ असे या तमाशाचे स्वरुप आहे.

तख्ती तमाशात गण, गवळण सादर केली जात असली तरी त्यात नृत्य गायनावर अधिक भर असतो. या तमाशात वग लावला जात नाही. किंबहुना या तमाशात वग नसतोच. रंगमंचाच्या मर्यादेमुळे नृत्यावरही काही मर्यादा आपोआपच येतात. हा चालता फिरता तमाशा असल्यामुळे प्रेक्षकही बैलगाडीबरोबरच चालत असतात.

पूर्वी नवस फेडण्यासाठी देवाला जाताना अशा तख्ती तमाशाचे आयोजन केले जात असे. सध्या काही गावातून सामुदायिक उत्सवाच्या वेळी तख्ती तमाशाची मिरवणूक काढली जाते. आता ही प्रथा हळूहळू लोप पावत चालली आहे.

एकूणच मराठी मुलुखातील जनसामान्यांच्या सांस्कृतिक जीवनात तमाशाच्या या खेळांना अनन्यसाधारण महत्त्व काही वर्षापर्यंत तरी होते. आता तमाशाचे हे प्रकार हळूहळू लोप पावत असले तरी 'लोकनाट्य' म्हणून ओळखला जाणारा तमाशा आजही तसाच टिकून आहे. महाराष्ट्रात जत्रा, उत्सवप्रसंगी लोकनाट्य मंडळी हा तमाशा करताना आजही दिसतात. यावरून लोकांमध्ये तमाशाची आवड आजही कायम असल्याचे दिसून येते. या लोकनाट्याला ग्रामीण भागात 'तमाशा' म्हणूनच ओळखले जाते. तमाशा हा महाराष्ट्रातील मराठी लोकजीवनाचा सांस्कृतिक पैलू आहे. मराठी लोकमनाला भावणारा हा एक लोककला प्रकार आहे. हे आपल्याला नाकारता येत नाही.

आता लोकनाट्य तमाशाची आजची स्थिती काय आहे ? तमाशा कसा बदलत गेला ? त्याला कोणकोणती कारणे कारणीभूत होती ? हे पाहू.

**तमाशाचे बदलते स्वरुप :**

महाराष्ट्रात गेल्या शंभर दीडशे वर्षात तमाशा प्रामुख्याने महार आणि मांग या जातीने केला आणि टिकवला. डौरी, गोंधळी, डोंबारी, कोल्हाटी या समाजातील खालच्या वर्गातील लोकांनीही तामशा आजपर्यंत टिकवून धरला आहे. ही सर्व मंडळी अगदी खालच्या थरातील असल्यामुळे त्यांना प्रतिष्ठित लोकांत कलावंत म्हणून कधीच मानाचे स्थान मिळाले नाही. तमासगीर हेही कलावंत असतात हे

अद्यापि लोक मानायला तयार नाहीत. किंबहुना त्यांची अजून तशी मानसिकताच झालेली नाही.

या तमाशातील स्त्रियांची नावेसुद्धा 'कबनूरकरीन', 'सातारकरीन' अशीच आहेत. त्यातून ती किती हीन दर्जाची आहे हेच भासविण्याचा प्रयत्न केला जातो. शनिवारवाड्यात गेलेला 'राम जोशी' हा 'जोशी' होता म्हणूनच हीन मानलेली लावणीही घेऊन तो तिथंपर्यंत पोहचू शकला होता. पण बाकीच्यांना अजूनही मान नाही. समाजात सर्वांच्या बरोबरीचे, इज्जतीचे स्थान नाही.

पेशवेकाळात खऱ्या अर्थाने तमाशा बहरला होता. या काळात तमाशा नृत्य, संगीत आणि गीत (लावणी, पोवाडे) या स्वरुपाचा होता. या काळात शाहिरांची एक उज्ज्वल परंपरा उदयास आली. या तमाशाच्या फडाचे स्वरुप शुद्ध रंजनप्रधान होते. पुढे काही वर्षे हे स्वरुप असेच टिकून राहिले. आजच्या तमाशाची खरी जडणघडण पेशवेकाळातच झाली असे म्हणता येते.

पेशवाईच्या अस्तानंतर शाहिरांचा राजाश्रय गेला. त्यांची स्थिती भांबावल्यासारखी झाली. उदरनिर्वाहासाठी आणि लोकांच्या मनोरंजनाचा उद्देश समोर ठेवून ते आता उघड्यावर आपल्या तमाशाचे फड करू लागले आणि शृंगारीक लावणी रंगमंचावर आली. लोकांची मने तिने काबीज केली आणि 'तमाशा म्हणजे शृंगार' असा समज कायमचाच रुढ झाला. पेशवेकाळापासून चालत आलेली 'दौलतज्यादा' ही पद्धती आजही तमाशातून पहावयास मिळते. तमाशातील 'दौलजज्यादा म्हणजे प्रेक्षकांकडून तमाशाला मिळालेली दाद किंवा एक प्रकारची देणगी आहे. सध्या दौलतज्यादा या पद्धतीचे स्वरुप विकृत आणि किळसवाणे झालेले दिसते. त्यातच आजकाल 'संगीतबारी या नावाने ओळखला जाणारा केवळ

स्त्रियांच्या नाचाचा एक प्रकार तमाशात सादर केला जातो. या नाचणाऱ्या स्त्रिया बहुतांशी कोल्हाटी समाजातील असतात. त्याचा हा नाच म्हणजेच 'संगीतबारी'.

तमाशामध्ये 'दौलतज्यादा', 'रंगबाजी', 'संगीतबारी' हे प्रकार घुसडल्यामुळे तसेच प्रेक्षकांच्या अभिरुचीतील बदल यामुळे तमाशावर अश्लीलतेचा शिक्का मारला गेला. स्वातंत्र्योत्तर काळात तमाशातील या अश्लीलतेमुळे त्यावर तमाशाबंदीही घालण्यात आली होती. तरीही या खास मराठी लोकनाट्यातील गोडवा व सामर्थ्य लक्षात घेऊन १९४८ मध्ये शासनाने दत्तो वामन पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली एक 'तमाशा सुधार समिती' नेमली व तिच्याद्वारे तमाशातील अश्लील प्रकारांना आळा घालून त्यात सुधारणा घडवून आणण्याचे ठरविले.

'मराठी लोकनाट्य तमाशा कला आणि साहित्य' या आपल्या पुस्तकात श्री नामदेव व्हटकर तमाशा लोकनाट्याची आजची सद्य:स्थिती काय आहे याबद्दल म्हणतात, "कोणत्याही कलेची स्थिती तिच्यासंबंधीच्या खालील गोष्टींवर अवलंबून असल्याचे दिसते.

१) ती कला निर्माण करणाऱ्या कलाकारांना आपल्या कलानिर्मितीमुळे मिळणारा मान, धन किंवा मानधन.

२) रसिकांची आर्थिक स्थिती, त्या कलेबद्दलची जाणीव किंवा आदर.

३) देशातील राजसंस्थेचा त्या कलेकडे पाहण्याचा दृष्टिकोन.

तेव्हा कोणत्याही कलेची स्थिती ही या वरील तीन गोष्टींवर अवलंबून असते आणि या तीन गोष्टींच्या सरमिसळीने त्या कलेची प्रगती किंवा अवनती होत असते."[३७]

कोणत्याही कलाकाराला त्याने केलेल्या कलेला प्रेक्षकांकडून, रसिकांकडून दाद मिळाली. तर तो पुन्हा नव्या हुरुपाने वेगवेगळ्या कला निर्माण करतो. भारत हा मुळात एक गरीब आणि शेतीप्रधान देश आहे. त्यामुळे तेथील शेतकरी, रांगडा, रगेल तसेच रंगेलही आहे. तमाशाचा मुख्य प्रेक्षक हाच असतो. त्यामुळे तो आजही सिनेमाचे महागडे तिकिट काढून सिनेमाला न जाता तमाशाच पहायला जातो. याचे कारण या तमाशा रसिकांची आर्थिक स्थिती तसेच त्यांना या रांगड्या कलेविषयी असणारी जाणीव आणि आदर हेच होय.

'कला आणि साहित्य हे राजाश्रयाने वाढते' या उक्तीप्रमाणे तमाशा ही कलासुद्धा पेशवेकाळात पेशव्यांच्या आश्रयामुळेच बहराला आली. यावरून लता, वनिता आणि कविता या आश्रयाशिवाय जगू शकत नाहीत, ह्या संस्कृत वचनाची सत्यता पटते.

स्वातंत्र्यापूर्वी खेड्यापाड्यातील लोकांचा तमाशाला जेवढा प्रतिसाद होता तेवढाही आता आजच्या तमाशाला मिळत नाही. काही तमासगीर रात्रभर तमाशात सोंगाड्याचे, राजाचे काम करतात आणि दिवसा रानात भांगलायला जातात किंवा फडातच पाणक्याचे काम करताना दिसतात.

तमासगिरांच्या या स्थितीला खुद्द तमासगीरांचा अशिक्षितपणा, अज्ञान आणि बदलत्या नव्या काळाकडे पाहण्याची असमर्थता ही कारणेही कारणीभूत ठरली आहेत. बऱ्याचदा जबरदस्त व्यसनामुळेही पुष्कळ तमासगिरांना चांगले आलेले असूनही ते सदैव कर्जबाजारी झालेले दिसतात. अज्ञान व दारिद्रयामुळेही त्यांच्यामध्ये हे सर्व दुर्गुण आले असावेत. गेल्या काही वर्षात मनोरंजनाच्या क्षेत्रात अनेक क्रांतीकारक बदल झाले आहेत. त्यामध्ये नाटक-सिनेमांचे युग हा महत्त्वाचा

बदल होय. सिनेमाचा नाटकावर जो परिणाम झाला तोच अत्यंत तीव्रतेने तमाशावरही झाला आहे.

आज तमाशात सिनेमातली गाणी म्हटली जातात. लावण्या तोडण्याचा प्रकार चालतो. दौलतज्यादा केली जाते. लावणीऐवजी प्रेक्षकांतून सिनेमातल्या गाण्यांची तसेच डिस्कोची मागणी केली जाते. त्यामुळे प्रेक्षकांचे मन राखण्यासाठी आणि तोच त्याचा रसिक 'मायबाप' असल्यामुळे त्यांना त्यांची मागणी पूर्ण करावीच लागते. याबाबत प्रसिद्ध तमाशा कलावंत आणि ज्यांच्या घराण्यात दीडशे वर्षापासून तमाशाची परंपरा आहे ते काळू-बाळू रुस्तुम अचलखांब यांच्या घरी आल्यानंतर गप्पा मारता-मारता तमाशाच्या सद्य:स्थितीबद्दल बोलताना ते प्रामाणिकपणे म्हणाले की, "...या गोष्टीला प्रेक्षक जबाबदार नसून आम्ही तमासगीर जबाबदार आहोत. कारण ही डिस्कोची आणि सिनेमांच्या गाण्यांची सवय आम्हीच त्यांना लावली आहे. जर आम्ही सर्व फडवाल्यांनी सिनेमाची गाणी गायचीच नाहीत असं ठरवलं तर पब्लिक काय करणार आहे ? डिस्कोची आणि सिनेमांच्या गाण्यांची मागणी करणारे प्रेक्षकांमध्ये फार थोडे असतात. अगदीच वाया गेलेली, जाण नसलेली ही पाच-पंचवीस तरुण कार्टी असतात. बाकी जो प्रेक्षकवर्ग असतो तो तमाशाचाच प्रेक्षक असतो आणि तो तमाशाच बघायला आलेला असतो."[३८]

काळू-बाळू यांनी तमाशाविषयी जे बोलले ते अगदी बरोबर आहे. जर खरोखरीच या कलावंतांनी डिस्को आणि सिनेमातली गाणी न लावण्याचा निश्चय केला तर तमाशाला पुन्हा पूर्वीचे दिवस येतील, यात वादच नाही.

डॉ. सुदाम जाधव यांनी आपल्या 'लोकनाट्य स्वरुप' या पुस्तकात काही तमासगिरांच्या मुलाखती घेतल्या आहेत. तमाशाच्या आजच्या स्थितीबद्दल श्री.

मधुकर नामदेवराव थोरात म्हणतात, ''तमाशा हा खऱ्या अर्थाने तमाशा राहिलाच नाही. त्याचे स्वरुप बदलले, तमाशाचे स्वरुप लोकनाट्यात जेव्हा झाले तेव्हाच त्यामधील जुन्या लावण्या गेल्या आणि त्या जागी सिनेमाची गाणी आली आणि हे सर्व झाले प्रेक्षकांच्या इच्छेनुसारच.''[३९]

कलावंताच्या सामुहिक मुलाखतीत कलावंत जुना तमाशा टिकून रहावा अशी अपेक्षा करून म्हणतात, ''जुना तमाशा टिकून राहवा असे आम्हा सर्वांनाच वाटते. पण अलीकडे प्रेक्षकांना सिनेमातली गाणीच अधिक आवडतात. जुनी लावणी त्याला आवडत नाही आणि तो समजूनही घेत नाही. याशिवाय पूर्वीच्यासारखे जिवंत म्हणजे निष्ठावंत कलावंत कमीच आहेत.''[४०] यावरून तमाशाची आजची स्थिती कशी आहे हे दिसते.

सध्या महाराष्ट्रात तमाशा फडांची संख्या सुमारे चारशेच्या आसपास आहे. ढोलकी फडांप्रमाणेच काही संगीतबाऱ्याही गावोगावी तंबूतून आपले कार्यक्रम करीत असतात. ही मंडळी वर्षातून तीनशे दिवस तरी फिरतीवर असतात. परंतु आजच्या संगीतबारीच्या कार्यक्रमातून मात्र तमाशाचा मूळचा अस्सल बाज फारसा आढळत नाही. त्यात बराच नाटकीपणा आला आहे. एवढेच नव्हे तर चित्रपटगीतांची छाप त्यांच्यातील लावण्यांवर पडलेली दिसते. काही पांढरपेशा शाहिरांनी कलापथकाच्या माध्यमातून राजकीय व सामाजिक प्रचाराचे कार्य केले. पूर्वीच्या तमाशाचे स्वरुप बदलून आता त्याला 'लोकनाट्य' ही संज्ञा दिली गेली, पण त्यातून खऱ्या तमाशाचे दर्शन घडत नाही. पूर्वीचा तमाशा रात्री दोन वाजता उभा राही आणि दुसऱ्या दिवशी रात्री दोनपर्यंत चाले. परंतु हे आधुनिक लोकनाट्य मात्र अवघे तीन तास चालते. त्यात पूर्वीच्या सोंगाड्याचा हजरजबाबीपणा दिसत नाही की, बारा बलुतेदारांनी

उभ्या केलेल्या 'सोंगा'चे स्वरुपही त्यात आढळत नाही. अशा या तमाशाबद्दल रुस्तुम अचलखांब म्हणतात, ''या कलेचे भवितव्य मात्र फारसे चांगले नाही. कारण त्यावर सिनेमा आणि नाटकांचा जबरदस्त प्रभाव पडत आहे. तमाशाचा मूळ बाज हल्ली कुठेच बघायला मिळत नाही. जुने कलावंत ज्यांच्याकडे अस्सल चीजा होत्या ते जवळजवळ सगळेच या व्यवसायातून निवृत्त झाले आहेत. नव्या पोरांनी या व्यवसायाचा बट्ट्याबोळ करून टाकला आहे.''[४१]

अशाप्रकारे तमाशा आपल्या मूळच्या अस्सल बाजापासून दूर जाऊन आज तो मुक्तनाट्याच्या स्वरुपात दिसू लागला आहे.

**समारोप :**

तमाशा हा महाराष्ट्रातला अत्यंत लोकप्रिय असा लोकरंजनाचा कलाप्रकार असून गेली सात–आठशे वर्षापासून तमाशाने बहुजन समाजाची लोकरंजनाची भूक भागविली आहे. 'तमाशा' हा लोककलाप्रकार सिद्ध होण्याअगोदर महाराष्ट्रामध्ये गोंधळ वाघ्यामुरळी, ललित, बहुरुपी, दशावतार, दंडार इ. विविध लोकधर्मीय कलाप्रकार प्रचलित होते. यामधून जनसामान्यांचे धार्मिक समाधान तर होत होतेच त्याचबरोबर त्यांच्या कलेच्या आनंदाची भूकही भागविली जात होती. या सर्व लोकधर्मीय कलाप्रकारातून तमाशाचे रुप सिद्ध झालेले आहे. तमाशाच्या या जडणघडणीत गोंधळी, वाघ्यामुरळीच्या परंपरेप्रमाणे शाहिरांचेही महत्त्वाचे योगदान आहे. या शाहिरांनी तमाशाला लोकप्रियता मिळवून दिली. अनंत फंदी, रामजोशी, प्रभाकर, होनाजी बाळा इ. शाहिरांनी त्यात आपल्या कवनांनी रंग भरला.

पेशवाईनंतर तमाशाला उतरती कळा लागली. इंग्रज काळात १८४३ मध्ये विष्णुदास भाव्यांनी नाटक हा प्रकार सुरु केला आणि समाजातील उच्चवर्णीय

लोकांचा वर्ग नाटकाकडे आकर्षित झाला. आणि तमाशा फड मग केवळ खेडूतांची करमणूक ठरला. त्यातूनच संगीतबारी, दौलतज्यादा हे प्रकार तमाशात आले. त्यामुळे तमाशा अश्लील बनू लागला.

आज ज्याला आपण 'लोकनाट्य-तमाशा' म्हणतो. त्यात गण, गवळण, लावणी, बतावणी आणि वग ही पाच महत्त्वाची अंगे आहेत. लावणीचे चालीवरून मुख्यत: सहा प्रकार पडतात. तमाशातील मुख्य वाद्ये म्हणजे ढोलकी, तुणतुणे, हलगी किंवा कडे आणि झांज यामध्ये नाचीच्या पायातील चाळांचीही भर पडते.

तमाशा हे दृक व श्राव्य स्वरुपाचे नाटक आहे. नृत्य, संगीत आणि नाट्य असे काहीसे स्वरुप तमाशाचे आहे. तमाशात नाची, सोंगाड्या, मावशी, सुरत्ये किंवा झीलकरी व सरदार इ. पात्रे असतात. पण आज त्यांची संख्या ३०-४० वर गेलेली दिसते. तमाशाचे सादरीकरण, त्यातील गायन आणि प्रदेशविशेष यांच्या आधारे तमाशात आलेल्या वेगळेपणामुळे तमाशाचे विविध प्रकार पडतात.

पेशवाईत बहरात आलेला व उत्कर्षाप्रत पोहोचलेला तमाशा हा कलाप्रकार आधुनिक काळात अश्लीलतेकडे झुकू लागलेला दिसतो. तमासगिरांना प्रेक्षकांच्या आवडीनिवडीनुसार तमाशा सादर करावा लागला. त्यातूनच सिनेमातली गाणी तमाशात गायली जाऊ लागली. तमाशातील नाचीचे अश्लील हावभाव, संगीतबारी, दौलतज्यादा हे प्रकार आले. त्यामुळे तमाशावर अश्लीलतेचा शिक्का मारला गेला. पण वस्तुत: नामदेव व्हटकर म्हणतात त्याप्रमाणे -

"लवकर यावे सिद्ध गणेशा ।
आतून कीर्तन वरून तमाशा ।।"

असे तमाशाचे भक्ती आणि शृंगार या दोहोंतून सिद्ध झालेले अभिनव रुप आहे.

-----

# संदर्भग्रंथ


| | | | |
|---|---|---|---|
| १) | मराठी विश्वकोश- खंड ७ | : | संपा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९७७, पृ. क्र. १५८. |
| २) | श्री. व्हटकर नामदेव | : | ''मराठीचे लोकनाट्य-तमाशा-कला आणि साहित्य'', यशश्री प्रकाशन, जवाहनगर, कोल्हापूर, पृ.क्र. ३६. |
| ३) | भारतीय संस्कृती कोश- खंड ४ | : | संपा. पं. महादेवशास्त्री जोशी, सह. संपा. तर्कतीर्थ सौ. पद्मिनी होडारकर, भारतीय संस्कृती कोश मंडळ, शनिवार पेठ, पुणे, पृ.क्र. ४१. |
| ४) | मराठी विश्वकोश खंड-७ | : | उनि., पृ.क्र. १५७. |
| ५) | श्री. व्हटकर नामदेव | : | उनि., पृ.क्र. ३९ व ४०. |
| ६) | मराठी विस्तारित शब्दरत्नाकर | : | संपा. कै.वा.गो. आपटे, आनंद कार्यालय, वरदा बुक्स, 'वरदा प्रकाशन', सेनापती बापट मार्ग, पुणे, प्र.आ., १९२२, पृ.क्र. २३७. |
| ७) | साकेत शालेय मराठी शब्दकोश | : | संपा. स.ध. झांबरे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. २००१, पृ.क्र. १२६. |
| ८) | बृहत-हिंदी-मराठी शब्दकोश | : | संपा. गो.प. नेने व श्रीपाद जोशी, संगम प्रेस, प्रा.लि., नारायण पेठ, पुणे, पृ.क्र. ३०४. |

| | | |
|---|---|---|
| ९) वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश | : | ग.रा. भटकळ फाउंडेशन, मुंबई, प्र.आ. डिसेंबर, २००१, पृ.क्र. २२१. |
| १०) प्रामाणिक हिन्दी कोश | : | संपा. रामचंद्र वर्मा, हितचिन्तक प्रेस, रामघाट बनारस, पृ.क्र. ४७६. |
| ११) आधुनिक हिन्दी शब्दकोश | : | संपा. डॉ. गोविन्द चातक, तक्षशिला प्रकाशन, नई दिल्ली, प्रथम संस्करण, १९८६, पृ.क्र. २५५. |
| १२) Marathi-English Dictionary | : | Complied by Prof. Madhav K. Deshpande & Assisted by Prof. Prakash M. Deshpande, Suvichar Prakashan, Mandal, Nagpur, first edition - Aug., 1967, Page No.214. |
| १३) Words in Indian English | : | S. Muthiah, Rajkamal Electric Press, Delhi, Page No. 150. |
| १४) व्यवहारे, शरद | : | 'लोकरंजनाची पारंपरिक माध्यमे', स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. जून, २००२, पृ.क्र. ६७ व ६८. |
| १५) व्हटकर, नामदेव | : | 'मराठीचे लोकनाट्य-तमाशा-कला आणि साहित्य', यशश्री प्रकाशन, जवाहरनगर, कोल्हापूर, पृ.क्र. ४२. |
| १६) जाधव, सुदाम | : | 'लोकनाट्यस्वरुप', सुलबा प्रकाशन, औरंगाबाद,द्वि.आ.,ऑगस्ट,१९९२,पृ.क्र.१३. |
| १७) जोशी वि.कृ. | : | 'लोकनाट्याची परंपरा', ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६१, पृ.क्र. २५२. |

| | | |
|---|---|---|
| १८) व्हटकर, नामदेव | : | ‘मराठीचे लोकनाट्य-तमाशा-कला आणि साहित्य’, उनि., पृ.क्र. ४९ व ५०. |
| १९) तत्रैव, | : | पृ.क्र.४५. |
| २०) व्यवहारे, शरद | : | ‘लोकरंजनाची पारंपरिक माध्यमे’, उनि., पृ.क्र. ७१. |
| २१) तत्रैव | : | पृ.क्र. ७२. |
| २२) जैतापकर पां.ल. | : | ‘तमाशा कला’, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, पृ.क्र. १३. |
| २३) व्यवहारे, शरद | : | ‘लोकरंजनाची पारंपरिक माध्यमे’, उनि., पृ.क्र.७८. |
| २४) व्हटकर, नामदेव | : | ‘मराठीचे लोकनाट्य-तमाशा-कला आणि साहित्य’, उनि., पृ.क्र.१५६. |
| २५) अचलखांब, रुस्तुम | : | ‘तमाशा’, ‘अनुष्टुभ’, जुलै-ऑगस्ट, १९८७, पृ.क्र.७०. |
| २६) बागूल, योगिराज | : | ‘तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा’, राजहंस प्रकाशन, पुणे, प्र.आ. जून, २००४, पृ.क्र.६७, ६८. |
| २७) व्हटकर, नामदेव | : | ‘मराठीचे लोकनाट्य-तमाशा-कला आणि साहित्य’, उनि., पृ.क्र.५७ व ५८. |
| २८) वाङ्मयीन संज्ञा संकल्पा कोश | : | ग.रा. भटकळ फाउंडेशन, मुंबई, प्र.आ., डिसेंबर, २००१, पृ.क्र.२२३. |

२९) शिंदे, विश्वनाथ : 'लोकसाहित्य मीमांसा', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ. २६ जानेवारी, १९९८, पृ.क्र.१९९-२००.

३०) अचलखांब, रुस्तुम : 'तमाशा', उनि., पृ.क्र.८७.

३१) बागूल, योगिराज : 'तमाशा: विठाबाईच्या आयुष्याचा', उनि., पृ.क्र. ७४, ७५.

३२) अचलखांब, रुस्तुम : 'तमाशा', उनि., पृ.क्र.८७.

३३) व्यवहारे, शरद : 'लोकरंजनाची पारंपरिक माध्यमे', उनि., पृ.क्र.९२.

३४) व्हटकर, नामदेव : 'मराठीचे लोकनाट्य-तमाशा-कला आणि साहित्य', उनि., पृ.क्र.६८.

३५) तत्रैव, : पृ.क्र. १२४.

३६) तत्रैव, : पृ.क्र. ७६, ७७.

३७) तत्रैव, : पृ.क्र. १०५.

३८) अचलखांब, रुस्तुम : 'तमाशा', उनि., पृ.क्र.८४.

३९) जाधव, सुदाम : लोकनाट्य स्वरुप, उनि., पृ.क्र. १४७.

४०) तत्रैव, : पृ.क्र.१५२.

४१) अचलखांब, रूस्तुम : 'तमाशा', उनि., पृ.क्र.८४.

-----